बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

कायदा सुव्यवस्था आढावा बैठक

बीड: विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेत कायदा व सुक्खवस्येबाबत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी तसेच नोडल अधिकारी यांच्या बैठकीत आढावा घेण्यात आला.निवडणूक विषयक कायदे व अनुषंगिक बाबी यावर जिल्हाधिकारी पाठक यांनी सविस्तर आढावा याप्रसंगी घेतल. यावेळी पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ तसेच या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कायद्यांबाबत सादरीकरण केले. प्रास्ताविक व आभार प्रदर्शन उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले.

बीड | शनिवार,दि.२१सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक५०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

बस-आयशरचा भीषण अपघात

दुःखद: ६ जण जागीच ठार; २० जण गंभीर जखमी

जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

वडीगोद्री मार्गावरील शहापूर जवळील वळणावर बस आणि संत्रा वाहतूक करणाऱ्या आयशरचा भीषण अपघात झाला. या भीषण अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून २० जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना (दि.२०) सकाळी ८.३० वाजेच्या दरम्यान घडली. अशी माहिती गोंदी पोलीसांनी दिली. गेवराईहून जालन्याकडे जाणारी गेवराई आगार बस क्रमांक एम एच २० बी एल ३५७३ व अंबडहून संत्रा घेऊन येणारा आयशर क्रमांक एम एच ०१सी आर ८०९९ चा वडीगोद्री जालना मार्गावरील शहापूर जवळ भीषण अपघात झाला. या अपघाताचा मोठा आवाज झाल्याने मठतांडा येथील ग्रामस्थांनी अपघातस्थळी धाव घेत बसच्या काचा फोडून जखमींना बाहेर काढले. यात सहाजण जागीच ठार झाले. तर २० जण गंभीर जखमी झाले आहेत.जखमींना अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून १७ जणांना सकाळी तर उर्वरित ३ जणांना दुपारनंतर जालना येथे हलवण्यात आले.

अपघातात सात जण मृत्यू

अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या माहितीनुसार सतीश देविदास नाईक (वय वर्षे २९) रा. मुरादेवी, शेख जब्बार (वय वर्षे ५२), रा. मुरादेवी, राहिबाई रंगनाथ कळसाईत (वय वर्षे ६५) रा. मेहकर, वाहक बंडू तुळशीराम बारगजे (वय वर्षे ५२)रा. वडगाव डोक, ता. गेवराई, पंचफुला भगवान सोळंके (वय वर्षे ६५) रा. सुरडी अशी आहेत, तर एका ४८ वर्षीय महिलेची ओळख पटली नाही.या बसमध्ये एकूण २५ प्रवासी होते. ज्येष्ठ महिला, पुरुष व मुलांचा समावेश होता.



माणूसकीचा शिलेदार बंडू बारगजे

गेवराई आगारातील गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले वाहक बंडू बारगजे बंडू भाऊ नावाने परिचित होते. आपल्या मनमिळावू स्वभावामुळे ते गेवराई आगारात अल्पावधीतच सर्वांच्या परिचीत झाले होते. एस टी कामगार संघटनेच्या माध्यमातून अनेक कर्मचाऱ्यांना त्यांनी न्याय मिळवून दिला आहे. बंडू भाऊ यांचे निधन झाल्याचे वृत्त कळताच गेवराई आगारातील अनेक कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. गेवराई आगारात आज शोकाकुल पसरली आहे. बंडू भाऊ यांच्या पश्चात पत्नी, मुलगा सुदर्शन, मुलगा वैभव, मुलगी प्रिती असा परिवार आहे. चळवळीत कोहीनूर हिरा गेल्याने वडगांव ढोक गावात चूल पेटलीच नाही. दैनिक पुण्यभूमी बारगजे कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

जखमी प्रवाशी : या अपघातामध्ये २० जण जखमी झाले आहेत. जखमींची नावे पुढीलप्रमाणे, गणेश कचरू क्षीरसागर (वय वर्षे ३६) रा. येलंब ता. शिरूर, सिद्धेश्वर गणेश क्षीरसागर (वय वर्षे १२) रा. येलंब ता. शिरूर, चालक गोरक्षनाथ लक्ष्मण खेत्रे (वय वर्षे ३७) रा. वाहेगाव, ता. गेवराई, भारत बन्सी हिंदोडे (वय वर्षे ५५) मारलर वाडी तालुका शिरूर, प्रभाकर भाऊराव गाडेकर (वय वर्षे ५५) रा. रेवकी देवकी, ता. गेवराई, बापूराव राधाकृष्ण निकम (वय वर्षे ५३) रा. साडेगाव ता. अंबड, शिफा मोसीन बागवान (वय वर्षे १०) रा. शहागड, ता. अंबड, अर्शिया मोबीन बागवान (वय वर्षे ४०) रा. सेलू, अफिफा मोहसीन बागवान (वय वर्षे १६)रा. सेलू, युसरा सोहेल शेख (वय वर्षे ३) रा. सेलू, कमल प्रभाकर गाडेकर (वय वर्षे ५०) रा. रेवकी देवकी, ता. गेवराई, विजय कुमार रमेश, (वय वर्षे ३६) रा. रावळ, उतरखंड, कमल रमेश रावलं (वय वर्षे ४०)रा. उतरखंड, कलावती चिमाजी कुऱ्हाडे(वय वर्षे ५०) रा. सुखापुरी ता. अंबड, जिल्हा जालना, कार्तिक सतीश कुऱ्हाडे (वय वर्षे ३) रा. सुखापुरी, भारत गणेश क्षीरसागर (वय वर्षे ३०) रा. शिरूर, ओंकार मनोज घुंगासे (वय वर्षे १७) रा. साष्ट, पिंपळगाव,अंजली अनिल दुधाने (वय वर्षे १५) रा. साष्ट पिंपळगाव, प्रवीण अनिल सुरासे (वय वर्षे २२) रा. अंतरवाली सराटी, अफसाना सोहेल शेख (वय वर्षे ३७) अशी जखमींची नावे आहेत.

राजकारण एक धंदा असून रोज शिव्या मिळतात

परिस्थिती: देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याची चर्चा

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मी २५ वर्ष राजकारणात आहे. कर्तव्यपूर्ती केल्यानंतर जनतेने आमचे आभार मानन्याचा निर्णय घेतला. २५ वर्षांत मी हे पहिल्यांदा पाहतोय की, ज्यांच्यासाठी काम केले, ते लोक आभार मानन्यासाठी पुन्हा बोलवत आहेत. कारण राजकारण असा धंदा आहे, जिथे सकाळपासून संध्याकाळपर्यंत शिव्या खाण्याची तयारी असेल तरच तुम्ही जनतेला न्याय देऊ शकता. कारण या शिव्या नसतात तर सामान्य माणसाच्या अपेक्षा असतात, अशी भावना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. 'वीजनिर्मिती कंत्राटी कामगार संयुक्त कृती समिती खापरखेडा'तर्फे पान २ वर...

मसणात गेलात तरी तिथे मिडिया असतो

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी विदेशात जाऊन आरक्षणाविरोधात भूमिका मांडली. त्यांना वाटले आपण दुसऱ्या देशात बोललो तर कुणाला कळणार नाही. पण आजकाल मसणातही मिडिया असतो. हे त्यांना बहुधा माहीत नसावे. त्यांनी आरक्षण कसे बंद करणार, याबाबतचा कार्यक्रम सांगितला, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

जवानांची बस दरीत कोसळली

दुःखद: जम्मू-काश्मीरच्या बडगावमधील घटना

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

जम्मू काश्मीरच्या बडगावमध्ये सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसचा मोठा अपघात घडला आहे. निवडणुकीसाठी तैनात असलेल्या जवानांना घेऊन जाणारी बस ब्रेल गावातील खोल दरीत कोसळली. बसमध्ये ३६ जवान प्रवास करत होते. यापैकी चार जणांचा मृत्यू झाला असून २८ जण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे.जम्मू-काश्मीरमध्ये १८ सप्टेंबर रोजी पहिल्या टप्प्याचे मतदान संपन्न झाले. निवडमुकीसाठी जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात बंदोबस्त तैनात पान २ वर...

आज बीड जिल्हा बंदची हाक!

आरक्षण: मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाला समर्थन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



मराठा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी अंतरवाली सराटी येथे सहाव्यांदा अमरण उपोषण सुरू केले असून त्यांच्या उपोषणाला संपूर्ण मराठा समाजाचे समर्थन आहे. उपोषणाच्या समर्थनार्थ दि.२१ सप्टेंबर रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील एक वर्षापासून घरदार सोडून लढा देत आहेत. सुरूवातीला आंदोलन केल्यानंतर सत्तेतील विविध मंत्र्यांनी भेटी देऊन आरक्षण देण्याचा शब्द दिला होता. यानंतर मुंबईवर मोर्चा काढल्यानंतर खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सगेसोयरेचे अधिसुचना काढून त्याची अंमलबजावणी करण्याचा शब्द दिलेला होता. तो शब्द अद्यापही पाळलेला नाही. यानंतरही उपोषण करण्यात आलेले असून प्रत्येक वेळी मंत्र्यांकडून वेळ मागवून घेतली जात आहे, परंतु शब्द पाळला जात नसल्याने आता सहाव्यांदा मनोज जरांगे पाटील यांनी अंतिम लढाई उपोषणाच्या माध्यमातून सुरू केली आहे.वाशी येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी तात्कळ करावा, हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागू करा, अंतरवाली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्या निमीत्ताने दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यात यावेत, मराठा आरक्षणासाठी बलीदान दिलेल्या कुटूंबातील सदस्यांना शासकिय नोकरी पान २ वर...

मनोज जरांगेंची प्रकृती खालावली

उपोषण:समर्थकांच्या आग्रहानंतर घेतले उपचार

जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

आमरण उपोषणामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली आहे. मनोज जरांगे समर्थक आणि मंत्री शंभूराज देसाई यांनी उपचार घेण्याची विनंती केली होती. अखेर मनोज जरांगे पाटील यांनी मध्यरात्री पावणेदोन वाजता उपचार घेतले.

मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाचा आजचा पाचवा दिवस आहे. कालपासूनच जरांगे यांची प्रकृती खालावली होती. यानंतर मोठ्या प्रमाणात लोकांनी त्यांना उपचार घेण्याची विनंती केली होती. त्यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी देखील पान २ वर...

हेझबोलाने इस्रायलवर १४० क्षेपणास्त्र डागले

देशविदेश: इस्रायलचाही प्रतिहल्ला ;युद्धाला तोंड फुटले?

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

हमास विरुद्ध इस्रायल असा वर्षभर संघर्ष उडाल्यानंतर आता इस्रायल विरुद्ध हेझबोला अशा संघर्षाला तोंड फुटले आहे. मागच्या वर्षी ७ ऑक्टोबर रोजी हमासने इस्रायलवर अनपेक्षित हल्ला करून जवळपास १४०० नागरिकांची हत्या आणि शेकडो जणांचे अपहरण केले होते. या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना इस्रायलने गाझापट्टीवर जोरदार हल्ले केले. वर्षभरापासून इस्रायल गाझा पट्टीवर हल्ले करत आहे. त्यादरम्यान आता लेबनानमधील हेझबोला या संघटनेशीही इस्रायलचा संघर्ष सुरू झाला आहे. दोन दिवसांपूर्वी लेबनानमधील हेझबोलाच्या सदस्यांकडे असलेल्या पेजरचा स्फोट होऊन अडीच हजाराहून अधिक लोक

जखमी झाले होते. तर अनेकजणांचा या हल्ल्यात मृत्यू झाला. त्यानंतर आता हेझबोलाने उत्तर इस्रायलवर १४० रॉकेट डागले आहेत.इस्रायलचया लष्कराने सदर हल्ले झाल्याचे मान्य केले आहे. हेझबोलाने या हल्ल्याबाबत माहिती देताना सांगितले की, हवाई दलाचे तळ आणि इस्रायलच्या तोफखाना पान २ वर...

अजित पवारांचा एक शिलेदार सोडणार साथ?

पडघम:शरद पवारांच्या गटात सामील होण्याची शक्यता

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

अहमदनगर जिल्ह्यातील उपमुख्यमंत्री ना अजित दादा पवार यांच्या पक्षातील एक आमदार लवकरच त्यांची साथ सोडणार असल्याची जोरदार चर्चा सध्या अहमदनगर जिल्हात सुरू असुन तो आमदार कोण याची चर्चा सध्या सुरू झाली आहे.

राजकीय पक्षांकडून आपल्या पक्षाची उमेदवारी निश्चित करण्याचे सुरु असतानाच अहमदनगर जिल्ह्यात सध्या एक वेगळेच राजकारण शिजत असल्याचे चित्र दिसत आहे आगामी विधानसभा पान २ वर...

वेलडन बीड शहर पोलिसांनी पुण्यात ठोकल्या बेड्या

बनावट नोटा प्रकरणाचा सूत्रधार अटक!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आठवडाभरापूर्वी बनावट नोटांचा गुन्हा बीड शहर पोलीस स्टेशन येथे दाखल असून त्याच्यामध्ये एक आरोपी अटक आहे आणि नवीन आणखी पाच आरोपी निष्पन्न झालेले आहेत. यातील फरार आरोपींचा शोध चालू असून यातील मुख्य सूत्रधार मनीस क्षीरसागर हा गुन्हा दाखल झाल्यापासून बनावट नोटांच्या साहित्यासह फरार आहे. यातील तपासातून पुढे आलेली माहिती अशी की, बनावट नोटा प्रकरणातील प्रमुख सूत्रधार मनिष क्षीरसागर हा पुण्यामध्ये मोठ्या प्रमाणात बनावट नोटा चलनात आणणार होता. या कामी त्याला त्याचा मित्र प्रवीण गायकवाड राहणार भक्ती कन्स्ट्रक्शन, बीड,



हल्ली मुक्काम आंबेगाव पुणे हा मदत करत होता. यासाठी प्रवीण गायकवाडला मनीष क्षीरसागर ने बनावट नोटांची नमुने आणि एक पिस्तल सुद्धा पाठवले होते आणि दोन लाखात चार लाख रुपये देण्याचे ठरले होते, अशा प्रकारची डील झाली होती. तसेच सदरील रक्कम ही किंवा बनावट पैसे हे सिंहगड कॉलेजला यातील आरोपी प्रवीण गायकवाड हा विद्यार्थ्यांचा प्रवेश देण्यासाठी जी रक्कम द्यावी लागते त्या रकमेत घुसवणार होता. यामध्ये प्रवीण गायकवाडला मदत करणारे पान २ वर...

राज्यपाल महिलेचे ५८ जणांशी लैंगिक संबंध

देशविदेश :७१ कोटींची लाच स्वीकारली, मिळाली शिक्षा

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

नैऋत्य चीनमधील सुंदर राज्यपाल अशी ओळख असलेल्या महिलेला आता १३ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच एक लाख ४० हजार डॉलरचा दंडही ठोठावण्यात आला आहे. या महिलेचे तिच्याच कार्यालयातील ५८ पुरुषांशी लैंगिक संबंध असल्याचे समोर आले होते. तसेच तिने ७१ कोटींची लाचही स्वीकारली होती. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टने दिलेल्या बातमीनुसार ५२ वर्षीय झोंग यांग यांनी गुइझोउ प्रांताच्या राज्यपाल म्हणून काम पाहिले होते. त्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ चीन च्या

सदस्य होत्या.यांग यांनी २२ व्या वर्षी राजकारणात पाऊल ठेवत कम्युनिस्ट पार्टी ऑफ चीन (उझउ) मध्ये प्रवेश केला होता. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टने दिलेल्या बातमीनुसार झोंग यांनी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी फळ आणि कृषी संघटनेची स्थापना केली होती. तसेच वृद्धांसाठी मदत करण्यासाठी वैयक्तिकरित्या पुढाकार घेतला होता. या कामामुळे झोंग यांना प्रसिद्धी मिळाली होती.जानेवारी २०२४ मध्ये पान २ वर...

नेमके काय साजरे केले?

तुम्हाला नेहमी 'आपले'च दोष का दिसतात? 'त्यांचे' का दिसत नाहीत? त्यांच्यावरही जरा टीका करून बघा की म्हणजे समजेल काय होते ते'' हा प्रतिवाद होण्याचा धोका आहेच; पण 'आपल्या'त काय सुरू असते, ते 'आपल्या'ला आतून नीट माहीत असते, त्यामुळे आपण 'आपली' चर्चा करावी, 'त्यांचे' 'ते' बघून घेतील, हे त्याचे उत्तरही तयार असायला हवे. याचे कारण असे की, आपल्या चुकांमुळे होणारे नुकसान दुसऱ्याच्या चुकांकडे बोट दाखवून झाकता येणारे नाही. संदर्भ आहे, अर्थातच नुकत्याच झालेल्या गणेशोत्सवाचा. आणि ईदचाही. गोकुळाष्टमीच्या दिवशी कृष्णाच्या नावाखाली घातल्या जाणाऱ्या आवाजी धुडगुसाचा आणि त्याचबरोबर लग्नाच्या वरातींपासून तथाकथित कार्यसम्राटांच्या कर्तृत्वाचे कवतुक करण्यासाठी केल्या जाणाऱ्या दणदणाटाचाही. नुकत्याच झालेल्या गणेशउत्सव आणि इद ए मिलाद या उत्सवांदरम्यान दोन्ही बाजूच्या लोकांनी ठिकठिकाणी मनसोक्त कानठळी ध्वनीनिर्मिती केली. त्यासाठी कुणी ढोलताशे वाजवले, कुणी डीजेचा वापर केला, तर कुणी लेझर बीम लाइट वापरले. 'गणेशोत्सवाच्या मिरवणुकीदरम्यान राज्यात २१ जणांचा मृत्यू', 'मिरवणुकीदरम्यान नाचता नाचता एकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू, कानठळी संगीताचा परिणाम असण्याची शक्यता', 'डीजेच्या आवाजामुळे अमुकतमुक गावातील अनेकांच्या कानांच्या पडद्याला इजा', 'मिरवणुकीदरम्यान लेझर बीम लाइटच्या वापरामुळे काहींच्या डोळ्यांवर परिणाम', 'विसर्जन करताना बुडून मृत्यू', 'मिरवणुकीदरम्यान ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटल्याने काही जणांचा मृत्यू', 'उत्सवादरम्यान यंदा ध्वनी प्रदूषणाची पातळी कमी, पण अनुज्ञेय पातळीपेक्षा ती जास्तच' या गेल्या दोन दिवसांतील राज्यभरातील बातम्या त्यामुळेच कमालीच्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत.गणेशोत्सवाच्या आधी पोलिसांनी राज्यभरात ठिकठिकाणी गणेश मंडळांना डीजे तसेच लेझर बीमचा वापर न करण्याबाबत तंबी दिलेली होती. पण पोलिसांचा धाक असण्याचे काही कारण नसल्यामुळे मंडळींनी या सगळ्याचा मनसोक्त वापर केला आणि उत्सव संपता संपता त्यापाठोपाठ या बातम्या आल्या. एरवी आपल्याला हवी ती उपासना करण्याचे, हवे ते उत्सव साजरे करण्याचे स्वातंत्र्य राज्यघटनेनेच दिलेले असल्यामुळे त्याबद्दल कुणी काही बोलण्याचा प्रश्न येत नाही. पण ते करत असताना इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा येत असेल, त्यांच्या जिवावर बेतत असेल, तर बोलणे क्रमप्राप्त ठरते. कुणी तरी निर्माण केलेल्या ठणठणाटामुळे कुणाच्या तरी कानांवर परिणाम होतो आहे, तर उर्वरितांनी होऊ दे व्हायचे ते असे म्हणून शांत बसायचे का? ढोलताशांच्या आवाजामुळे घरात बसलेल्या एखाद्या वृद्धाच्या हृदयात धडधड होत असेल तर त्यांनी सहन करावे, नाही तर पाकिस्तानात जावे, असे म्हणायचे का? फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण, हवेचे प्रदूषण झाले तरी चालेल, पण आम्ही आमचा आनंद असाच व्यक्त करणार हे म्हणणे मान्य करायचे का? डीजे, लेझर यांच्या परिणामाच्या नुसत्या शक्यता वर्तवल्या जात आहेत, असे म्हणून हे मुद्दे मोडीत काढणे किती योग्य आहे? मग प्रत्यक्ष परिणामांची वाट पाहायची आहे का, असा मुद्दा त्यातून उपस्थित होतो, त्याला उत्तर काय आहे? याशिवाय २४-२८ तास चालणाऱ्या विसर्जन मिरवणुका, त्यामुळे अडवले जाणारे रस्ते, सामान्य माणसाची होणारी गैरसोय या मुद्द्यांकडे आपण आणखी किती काळ हे असेच चालायचे म्हणून दुर्लक्ष करणार आहोत?आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय सुधारणा हा वाद आपल्याकडे झडला आणि त्यात 'आधी राजकीय' वाल्यांची सरशी झाली, ही गोष्ट फार नाही- जेमतेम दीडदोनशे वर्षांपूर्वीची. गणपती या देवतेचे सार्वजनिकीकरण आणि राजकीयीकरण हे याच काळातले. पण गेल्या तीन दशकांत या उत्सवातले आणि इतर सगळेच साजरीकरण दिवसेंदिवस कमालीचे 'आवाजी' होत चालले आहे. आपल्या देशात चालीरीती, प्रथा-परंपरा वेगवेगळ्या असल्या तरी सगळ्या माणसांचे कान, डोळे, हृदय, मेंदू हे अवयव अगदी एकसारखेच आहेत आणि कोणत्याही विपरीत परिस्थितीचा त्यांच्यावर सारखाच परिणाम होत असतो, हे सांगायला कुणा डॉक्टरची अजिबातच गरज नाही. सणवार साजरे करणे, लोकांना सांस्कृतिक जीवन असणे, त्यांनी ते जगणे, उपभोगणे हे सगळेच समजण्यासारखे आहे. पण ते करत असताना प्रचंड गर्दी निर्माण करणे, प्रचंड आवाज निर्माण करणे, लेझर बीमसारखे सर्वसामान्यांच्या डोळ्यांना थेट इजा करू शकणारे तंत्रज्ञान वापरणे यातून नेमके काय साधले जाते? सार्वजनिक पातळीवर आवाजाची पातळी किती असायला हवी, सणासुदीच्या काळात तिला किती उशिरापर्यंत सवलत असते, यासंबंधी न्यायालयाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यांची पायमल्ली करायला आपण इतके आतुर का असतो? ढोलताशांसारखे वाद्या जोश निर्माण करते हे खरे, पण एकदोन दिवसांसाठी सगळेच जण ते सतत वाजवायला लागले तर कानठळ्या बसायला लागतात, छातीत धडधडायला लागते. आणि हे सगळे शारीरिक परिणाम फक्त 'टीकातुरां'बाबतच घडतात असे नाही, तर ही वाद्यो वाजवणाऱ्यांच्याही घरातील वृद्ध माणसे, लहान बाळे, पाळीव प्राणी या सगळ्यांनाच त्या आवाजाचा कमालीचा त्रास होतो. बरे, ढोलताशे, डीजे, लेझर हे सगळे त्या एकदोन दिवसांपुरते असेल, तर एक वेळ समजण्यासारखे आहे. पण आयपीएल ते आंतरराष्ट्रीय असा कोणताही सामना जिंकण्यापासून ते कुणा कार्यसम्राट नगरसेवकाच्या तथाकथित सुपुत्राच्या प्रकटदिनापर्यंत कोणताही दिवस साजरा करण्यासाठी हल्ली या वाद्यारूपी 'आयुधां'चा वापर केला जातो. वाढदिवसाला तलवारीने केक कापण्याच्या 'संस्कृती'त यापेक्षा वेगळी अपेक्षा करता येत नसली तरी बटबटीतपणाकडून असंस्कृतपणाकडे आपला वेगाने प्रवास सुरू आहे, हे मान्य केले पाहिजे. एके काळी ब्रिटिशांविरोधात स्थानिकांची मने चेतवण्याचे काम करणाऱ्या आणि त्यानंतर लोकांच्या सांस्कृतिक भरणपोषणात योगदान देणाऱ्या या उत्सवाचे आपण काय करून ठेवले आहे? याच उत्सवातून आता त्यात सहभागी होणाऱ्या लोकांना अंध आणि बहिरे करायचे आहे का? त्याविरोधात आजच, आत्ताच बोलत नाहीत, ते का मूक आहेत?.५

विद्यार्थ्यांनी उद्योगांमध्ये नाव लौकिक करावे

प्रा.सोमनाथराव बडे : गोरक्षनाथ महाविद्यालयात उद्योजकता कार्यक्र

बीड/ पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ढेकनमोहा येथे मा.ना.मंगल प्रभातजी लोढा यांच्या संकल्पनेतून कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता विभाग आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र महाराष्ट्र शासन अंतर्गत गोरक्षनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ढेकणमोहा या आमच्या कॉलेजची निवड करण्यात आली या कार्यक्रमाचे उद्घाटन भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी,मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने वर्धा या ठिकाणी करण्यात आले. हा कार्यक्रम लाईव्ह पद्धतीने गोरक्षनाथ कनिष्ठ महाविद्यालयात दाखवण्यात आला यावेळी उपस्थित संस्थेचे सचिव प्राचार्य सोमनाथरावजी बडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना नोकरीच्या स्पर्धा न करता एखादा छोटा मोठा व्यवसाय उद्योगात आपले नावलौकिक करावे असे बोलत उपस्थित विद्यार्थ्यांना

मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी उपस्थित नोडल अधिकारी म्हणून भिसे सर,कॉर्डिनेटर म्हणून मयूर बडे, मुख्याध्यापक डी.एस.मुंडे सर, सहसंचालक संजय बडे सर, पर्यवेक्षक घोळवे सर, सतीश सांगळे सर,मनोज बडे सर, मा.सरपंच नागेश शिंदे, उपसरपंच थापडे पाटील, प.से.प्र.चे गोवर्धन दराडे सर,रामजी भोगे, पत्रकार जोशी सर,संस्थेतील सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा मिळाली

महाराष्ट्र शासन यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग चाणक्य कौशल्य विकास केंद्र गोरक्षनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय ढेकनमोहा येथे कार्यक्रम पार पडला या कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता आपण उद्योग व्यवसाय करून आपण आपले नवचैतन्य निर्माण करू शकतो असा आत्मविश्वास या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अनुभवास आला.

-प्रा. सोमनाथराव बडे
सचिव: मकरध्वज शिक्षण संस्था चिंचवन

ढेकनमोहा येथे सौर ऊर्जा पंपाची चोरी

घाटसावळी / पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या जिल्ह्यामध्ये चोराचे सत्र सुरू असून यामध्ये विहिरीवरील मोटार चोरीचे प्रमाण जास्त झाले असून यामध्ये भर म्हणून ढेकनमोहा येथील शेतकरी वैशाली शिवभूषण मेनकुदळे यांच्या शेतामधील सौर ऊर्जा पंपाची चोरी झाली आहे ढेकणमोहा शिवारातील २२० गट क्रमांक मधील विहिरीवरील पाच एचपी सौर ऊर्जा पंपाची सुरू झाल्या असून अंदाजे किंमत एक लाख रुपये आझा चोरट्यांनी चोरून नेला असून त्यांच्यावर पिंपळनेर स्टेशनमध्ये रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे अशा पंपाच्या चोरीमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरला आहे

आ. सोळंके यांचा सत्कार शनिवार ऐवजी सोमवारी

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांना महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते नुकताच उत्कृष्ट संसद पटु पुरस्कार मिळाल्याबद्दल माजलगाव येथील सर्वपक्षीय समितीच्या वतीने नागरी सत्काराचे आयोजन आज दि. २१ शनिवारी करण्यात आले होते पण हा कार्यक्रम पुढे ढकलला असुन नागरी सत्कार कार्यक्रम दि. २३ सोमवारी होणार असल्याची माहिती नागरी सत्कार समितीचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी व सचिव अच्युतराव लाटे यांनी दिली आहे.

आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या नागरी सत्काराचे आयोजन येथील वैष्णवी मंगल कार्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाची समितीच्या वतीने जय्यत तयारी देखिल करण्यात आली होती परंतु शनिवारी होत असलेल्या जिल्हा बंदमुळे हा नागरी सत्कार कार्यक्रम शनिवार ऐवजी दि. २३ सोमवारी सकाळी ११.०० वाजता वैष्णवी मंगल कार्यालयात होणार आहे. या नागरी सत्कार कार्यक्रमास मतदारसंघ वासीयांनी सोमवारी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन नागरी सत्कार समितीचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, सचिव अच्युतराव लाटे, नवनाथ धाईजे, नासेरखॉन पठाण यांनी केले आहे.

पान एक वरून

राजकारण एक धंदा असून

भव्य कामगार मेळावा आणि सत्कार सोहळ्यानिमित्त ते बोलत होते.वीज कंत्राटी कामगारांचे कल्याण करायचे असेल तर बावनकुळे-फडणवीस जोडी असेल तरच हे कल्याण होऊ शकते. २०१९ साली चंद्रशेखर बावनकुळे यांनी ऐतिहासिक निर्मय घेतला होता. ज्यामुळे कंत्राटी कामगारांचा फायदा झाला. आताही बावनकुळे यांनीच पुढाकार घेतल्यामुळे कंत्राटी कामगाराचा लाभ होत आहे. ऊर्जा खाते चालवत असताना बावनकुळेच माझे मार्गदर्शक आहेत, असूही विधान देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमादरम्यान केले.वीज प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन करता करता बावनकुळे जिल्हा परिषदेत गेले, मग आमदार झाले आणि नंतर मंत्रीही झाले, असे कौटुकही देवेंद्र फडणवीस यांनी केले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी राज्य सरकारच्या योजनांची माहिती दिली. तसेच लाडकी बहीण योजनेच्या विरोधात काँग्रेसचे आमदार सुनील केदार यांचे सहकारी उच्च न्यायालयात गेले आहेत, असे सांगितले. आमच्या बहिणींची योजना बंद करायची भाषा कराल, तर पुढचे पाच वर्ष सोडाच पण २५ वर्ष तुम्ही सत्तेत येणार नाहीत, असा दावा फडणवीस यांनी केला. आम्ही जर महिलांसाठी, बहिणींसाठी योजना देत असू तर तुम्हाला पोटदुखी होण्याचे कारण काय? असाही सवाल फडणवीस यांनी उपस्थित केला

जवानांची बस दरीत

करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्याचे मतदान आता २५ सप्टेंबर रोजी होणार आहे. २६ विधानसभा मतदारसंघात होणार असलेल्या मतदानासाठी ३६ जवानांची तुकडी रवाना होत होती. यावेळी बडगाव जिल्ह्यातील ब्रे गावानजीक दरीत कोसळून बसचा अपघात झाला.यावेळी स्थानिकांच्या मदतीने सुरक्षा दलाने बचाव कार्य हाती घेतले. जखमी जवानांना नजीकच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघाताचे अनेक व्हिडीओ आता एक्स या सोशल मिडिया साईटवर व्हायरल होत आहेत. बसचा पूर्ण चेंदामेंदा झाल्याचे या व्हिडीओंमध्ये दिसत आहे.

आज बीड जिल्हा

देण्यात यावी, मागेल त्या गरजवंत मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, मराठा आणि कुणबी एकच आहे हा अद्यादेश पारीत करण्यात यावा, अशा मागण्या आहेत. या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अमरण उपोषण सुरू केले असून आता उपोषणाच्या पाचव्या दिवशी अखंड मराठा समाजाच्या वतीने दि.२१ सप्टेंबर वार शनिवार रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आलेली आहे. यात अत्यावश्यक सेवा यांना या बंदमधून वगळण्यात आलेले आहे. सर्व व्यापारी बांधवांनी आपआपले व्यवसाय बंद ठेवून सहकार्य करावे, असे अवाहन करण्यात आले आहे. बंदच्या दिवशी संबधित तहसीलदार किंवा पोलीस ठाण्यातील अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहेत. बीड तालुक्यातील सर्व मराठा सेवकांनी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय याठिकाणी जमा होऊन निवेदन देण्यात येणार आहे. मराठा सेवकांनी हा बंद शांततेत पाळावा, असेही अवाहन करण्यात आले आहे.

हेझबोलाने इस्रायलवर

मुख्यालयाला या हल्ल्याद्वारे लक्ष्य करण्यात आले आहे.हेझबोला गटाकडे ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी उत्तर इस्रायलवर हल्ला करण्याची प्रचंड लष्करी क्षमता आहे, तसेच तेल अवीवसारख्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या शहरांसह ज्यू राज्याच्या इतर भागांवरदेखील हल्ला करण्याची क्षमता आहे. हेझबोलाने २००६ च्या इस्रायलबरोबरच्या युद्धात आपली लष्करी क्षमता दाखवली होती. हे युद्ध ३४ दिवस चालले. त्या दरम्यान १६५ इस्रायली ठार झाले (१२१ आयडीएफ सैनिक आणि ४४ नागरिक) आणि इस्रायलच्या अर्थव्यवस्थेचे आणि पर्यटन उद्योगाचे लक्षणीय नुकसान झाले. या युद्धात सर्वात मोठे नुकसान हेझबोला आणि लेबनीजचे झाले. त्यांच्याकडील मृतांची संख्या किमान १,१०० होती. इस्रायल डिफेन्स फोर्सेस (आयडीएफ) या गटाला निष्प्रभ करण्यातही हेझबोला अयशस्वी ठरले.

अजित पवारांचा एक शिलेदार

निवडणुकीत सर्वाधिक चर्चेतील लढती होणार आहेत त्यात प्रामुख्याने अहमदनगर जिल्ह्यातील काही मतदारसंघात अनपेक्षित लढती पाहवयास मिळणार आहे. अहमदनगर जिल्ह्यातील अजित दादा पवार यांच्या पक्षातील एक आमदार सध्या एका मुद्दा वरुन नाराज असल्याचे समजते आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्ह्यातील राजकारण कोणते नवीन वळण घेणार आहे या कडे राजकीय पक्षाचे लक्ष लागून आहे मागील लोकसभा निवडणुकीत ना अजितदादा पवार यांना शरद पवार यांच्या पक्षाकडून जे चेकमेट मिळाले होते त्याचीच पुनरावृत्ती पुन्हा होती का पक्षांतराची फक्त चर्चाच आहे का हे पाहणे मोठे रंजक ठरणार आहे.

बनावट नोटा प्रकरणाचा

पुणे येथील लोक असण्याची शक्यता आहे याचाही तपास चालू आहे. हे तपासात निष्पन्न झाल्यानंतर पुणे येथे प्रवीण गायकवाड ला अटक करण्यासाठी एका टीमला पाठवण्यात आले. टीमने प्रवीण गायकवाड यास बनावट नोटांसह आणि एक गावठी पिस्टल अशा प्रकारचे हत्यार त्याचे राहते घर आंबेगाव इथून जप्त केले आहे. तसेच यातील आरोपी प्रविण गायकवाड आणि आकाश जाधव या दोघांचेही दिनांक चोवीस सप्टेंबरपर्यंत पीसीआर मिळालेला आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विश्वंभर गोलडे, शितलकुमार बल्लाळ, पोलीस निरीक्षक बीड शहर, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, बाळासाहेब सिरसाठ, मनोज परजणे, अशपाक सय्यद, जयसिंह वायकर या अंमलदार यांनी केली आहे.

राज्यपाल महिलेचे ५८

गुइझौ रेडिओ आणि टीव्ही वृत्तवाहिनीने त्यांच्यावर एका माहितीपटाचे प्रदर्शन केले होते. त्यानंतर झोंग यांग वादात अडकल्या. सरकारी विभागात गुंतवणूक करण्याच्या नावाखाली झोंग यांनी पसंतीच्या कंपन्यांना कंत्राटे मिळवून दिली आणि त्याबदल्यात लाच स्वीकारली, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.

लैंगिक संबंधाचे आरोप काय होते? : झोंग यांग यांनी पुरुष सहकाऱ्यांबरोबर संबंध प्रस्थापित करता यावेत यासाठी आपल्या अधिकार आणि पैशांचा दुरुपयोग केला. त्यांनी ओव्हर टाईम आणि व्यावसायिक दौऱ्याच्या नावावार प्रियकरांशी संबंध जपले. चीनमधील नेटइज न्यूजशी बोलताना झोंग यांग यांनी सांगतिले होते की, झोंग यांगकडून लाभ मिळावा यासाठी अनेक पुरूष तिचा प्रियकर होणे पसंत करत. तरी काही पुरूषांनी तिच्या धाकाला घाबरून अनिच्छेने लैंगिक संबंध ठेवले. झोंग यांग यांचे ५८ प्रियकर होते, अशी माहिती आता समोर आलेली आहे. यातील अनेक प्रियकरांबरोबर झोंग यांग यांनी लैंगिक संबंध ठेवले होते. झोंग यांग यांच्यावरील गुन्हे सिद्ध झाल्यानंतर त्यांना आता १३ वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच १ लाख ४० हजार डॉलरचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

मनोज जरांगेंची प्रकृती... मनोज जरांगे यांना फोन करुन उपचार घेण्याची केली विनंती केली होती. त्यानंतर जरांगे यांनी उपचार घेतले आहेत. मध्यरात्री पावणेदोन वाजता मनोज जरांगे यांना डॉक्टरांकडून सलाईन लावण्यात आले. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस होता. यावेळी मध्यरात्री मनोज जरांगे समर्थक आंदोलकांनी त्यांना उपचार घेण्याचा आग्रह केला. या आग्रहानंतर त्यांनी उपचार घेण्यास होकार दिल्याने त्यांच्यावर आता उपचार करण्यात आलेत. सगेसोयरेच्या अधिसूचनेची अंमलबजावणी करुन मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्यावे, या मागणीसाठी मनोज जरांगे अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. दरम्यान, त्यांची प्रकृती खालावली आहे. जरांगेंना उपोषणाच्या चौथ्या दिवशी चालणं देखील मुश्कील झालं होतं. सहकाऱ्यांचा आधार घेत ते चालताना दिसत होते. मनोज जरांगे यांना थकवा जाणवतोय. ते स्टेजवरून खाली उतरताना अचानक खाली बसलेले पाहायला मिळाले. यावेळी त्यांना उठता येत नव्हते. दरम्यान, सरकारकडून मनोज जरांगेंना कोणता प्रतिसाद मिळतोय का? याकडे सर्वांचे लक्ष आहे. आजवर मराठा समाजाने सहकार्याचीच भूमिका घेतली आहे. एक वर्षापासून लढा सुरू आहे. लाखोंची जनता रस्त्यावर उतरल्याच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याच वाईट वाटायला पाहिजे, अशी प्रतिक्रिया म्हणून जरांगे यांनी दिली होती. मनोज जरांगेंचे सध्या सहावे उपोषण सुरु आहे. त्यामुळं यावर आता सरकार काय भूमिका घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

पान सहा वरून

परळीत हेल्थ केअर क्लिनिकचे

कराड यांनी नवी मुंबई येथे सुमारे दहा वर्ष उत्तम सेवा केलेली आहे. कोरोना काळात त्यांनी केलेल्या कार्याचे सर्वत्र कौतुक झाले होते .त्यांनी आता परळीकरांच्या सेवेसाठी हेल्थकेअर क्लिनिक सुरू केले आहे. २२ सप्टेंबर २०२४ रोजी बारा वाजून ३५ मिनिटांनी नामदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते या क्लिनकचे उद्घाटन संपन्न होईल. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सेवानिवृत्त मुख्याध्यापक ए .तु .कराड व डॉ.विवेक एकनाथ कराड यांनी केले आहे.

पेयजल योजनेचे काम राहिले

सारख्या नेतृत्वाचे नाव अशा भुरट्या कार्यकर्त्यांन मुळे, गुत्तेदारांन मुळे खराब होत आहे पेयजल योजना ही आमदारा पंकजाताईनी लोकांना पाणी पुरवठा करण्यासाठी दिली होती का भुरटे पुढारी, गुत्तेदार पोसण्यासाठी दीली होती असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे .

स्वगृही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये

दुपारी २ वाजता पक्षप्रवेश सोहळा पार पडला. दिलीप अण्णा गोरे यांच्या समवेत पक्षप्रवेश करत असलेले संजय गव्हाणे,माजी उपसभापती पंचायत समिती, बीड, फेरोज पठाण, माजी पंचायत समिती सदस्य, बीड, अशोकराव पांढरे एसटी कामगार संघटना नेते यांच्यासह समर्थकांचा प्रवेश झाला. दिलीपराव गोरे आणि त्यांचे सर्व सहकारी पवार साहेबांच्या विचाराचे जुनेच सहकारी असल्याने त्यांनी पक्षाबरोबर भविष्यात खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार करत पवार साहेबांच्या विचाराला साथ देण्याचा निर्णय घेतला. दिलीपराव गोरे यांनी आपल्या समर्थकांसह बीड जिल्ह्यामध्ये पक्षाची शक्ती आणि ताकद निर्माण करण्यासाठी पक्षासोबत आले त्याबद्दल प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांनी गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, प्रवेशानंतर दिलीपराव गोरे व प्रवेश केलेल्या त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या विनंतीवरून बीड जिल्ह्यामध्ये लवकरच पक्षाचा मोठा मेळावा घेऊन त्यांच्यावर योग्य ती जबाबदारी सोपवली जाईल असे जाहीर केले.

गावे बीड मध्येच पूर्ववत

लोकांना अंबाजोगाईला येणे खुप लांब पडत आहे. व त्यांची गैरसोय होत आहे. तरी १८ ऑगस्टला काढलेला आदेश रद्द करून केज मतदारसंघात येणारी बीड तालुक्यातील त्या गावांचा समावेश बीड सार्वजनिक बांधकाम विभागातच करावा अशी विनंती व प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा

यामध्ये सौ. रेखा निलेश मालपाणी सौ. सोनिया शुभम सिकची,सौ.दिपाली दयानंद ढोबळे, सौ. अर्चना प्रसाद देवळे सौ. सुनिता संभाजी रसाळ, सौ. अंजली राहुल बादाडे , सौ कमल लक्ष्मण कदम या महिला ७ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अंतिम फेरी करिता या सर्व महिलांची निवड झाली. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील कार्यकर्ते नगरसेवक व नागरिक यांनी परिश्रम घेतले.

केजमध्ये अल्पवयीन मुलगी

अल्पवयीन पीडितेच्या तक्रारीवरून दि. १९ सप्टेंबर रोजी केज पोलीस ठाण्यात पीडितेच्या मामाच्या मुला विरुद्ध लग्नाचे आमिष दाखवून बळजबरिने बलात्कार केल्याचा व बाल लैंगिक अत्याचार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत.

दबावाला झुगारून विधानसभा

येऊन सुद्धा बाजीराव जगताप यांनी शिवसेना भाजपा युतीला समर्थन दिले. सरकारच्या माध्यमातून विविध विकास योजना खेचून आणल्या. उसाच्या राजकारणात दबलेल्या शेतकऱ्याला भयमुक्त करून त्यांच्यासाठी हक्काचा साखर कारखाना उभारला. सभासद किंवा बिगर सभासद असा भेदभाव न करता सर्वसामान्य शेतकऱ्याच्या ऊसाला रास्त भाव दिला. जनतेच्या सुखदुःखात सामील होऊन त्यांच्याशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. गावागावात सर्वसामान्य कार्यकर्त्याला ताकद देऊन त्यांना सन्मान मिळवून दिला. मात्र एवढे सगळे करत असताना पक्षनेतृत्वांकडून आम्हाला उपेक्षाच मिळाली. त्यामुळे आता कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवायचीच असा निर्धार केला आहे, असे सांगत ही माझ्या आयुष्यातील आरपारची लढाई असल्याचा गर्भित इशारा मोहन जगताप यांनी दिला आहे. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद सावंत यांनी केले तर आभार नागेश कानडे यांनी मानले. ग्रा.पं.सदस्य अतुल चव्हाण व बिभीषण शेंडगे यांच्या सहकाऱ्यांनी कमी वेळात उत्कृष्ट नियोजन केले. यावेळी शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

मराठवाडा विकासात अमूल्य योगदान

मंत्री संजय बनसोडे | सिंदफणा शाळेत क्लस्टरचे उदघाटन

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी – केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आयोजित व्हॉलीबॉल क्लस्टर ९ स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी महाराष्ट्राचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते सिंदफणा पब्लिक स्कूल येथे संपन्न झाले. या कार्यक्रमाला बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या भाषणात क्रीडामंत्री बनसोडे यांनी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय सुंदर रावजी सोळंके यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी म्हटले, सुंदररावजी सोळंके यांचे मराठवाडा विकासामध्ये अमूल्य योगदान आहे. त्यांच्या कार्यकाळात मांजरा प्रकल्प, धनेगाव धरण, माजलगाव धरण यांसारखे अनेक महत्त्वाचे सिंचन प्रकल्प पूर्ण झाले.

नामदार संजय बनसोडे यांनी माजलगावमध्ये नवीन क्रीडा संकुल उभारण्यासाठी भरीव निधी देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्रभर अनेक क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्याचेही सांगितले. क्रीडामंत्र्यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांना महायुती सरकारचा पूर्ण पाठिंबा राहील असे आश्वासनही दिले.सीबीएसईच्या या व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्र आणि गोव्यातील संघ सहभागी झाले आहेत. स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्याला महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे पंच, विविध संघ आणि त्यांचे प्रशिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाला विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश दादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, धैर्यशील काका सोळंके, जयसिंग भैया सोळंके, तहसीलदार संतोष रुईकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, अच्युतराव लाटे, बुखारी शाळेचे सचिव खुर्शीद नाईक, गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, सीबीएसई क्लस्टरचे निरीक्षक प्रवीण चाळक, सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, आणि लोकनेते सुंदर रावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेचे कार्यकारी अधिकारी सुहास सोळंके, प्राचार्य गोवर्धन सानप, जिल्हा क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, पालक, विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सिंदफणा पब्लिक स्कूलला व्हॉलीबॉल क्लस्टरचे यजमानपद मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाने मराठवाड्यातील क्रीडा क्षेत्रातील विकासाला चालना देण्याचे संकेत दिले असून, स्थानिक पातळीवर क्रीडा सुविधा वाढवण्याच्या शासनाच्या प्रयत्नांचे प्रतिबिंब दिसले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सखाराम जोशी आणि अर्चना जाधव यांनी तर आभार प्रदर्शन सिंदफणा पब्लिक स्कूलचे सचिव मंगलाताई सोळंके यांनी केले.

अंबाजोगाईत रक्तदान शिबिराला प्रतिसाद

अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.नामदार रविंद्रजी चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाई येथील सार्वजनिक बांधकाम विभाग येथे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन कनिष्ठ अभियंता गोविंद मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय येथील रक्ताचा तुटवडा झाल्याने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले.जमा झालेले रक्ताच्या पिशव्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय येथील येथे जमा करण्यात आले.

यावेळी कनिष्ठ अभियंता गोविंद मुंडे, कनिष्ठ अभियंता गोविंद शेळके, राहुल घोडके,रंजीत माने, सचिन कांबळे, अतुल मुंडे, अरुण मुंडे, अनिरुद्ध लंगे इत्यादी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षकांनी आंदोलनात सहभागी व्हावे

लक्ष्मण बहिरवाळ:प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने १५ मार्च २०२४ व ५ सप्टेंबर २०२४ रोजी अनुक्रमे संचमान्यता बाबत नवे निकष तसेच २० आणि २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत सेवानिवृत्त व डी. एड., बी एड. कंत्राटी शिक्षक नियुक्ती बाबत शासन निर्णय निर्गमित केले आहेत. हे शासन निर्णय रद्द करण्यासाठी सर्व शिक्षक संघटना समन्वय समितीने राज्यभर आंदोलनाची हाक दिली आहे. सदरील आंदोलनात शिक्षक सेना बीड जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ यांच्या नेतृत्वाखाली सक्रिय सहभागी होत आहे, अशी माहिती जिल्हा सरचिटणीस नरेश गंधगे यांनी दिली आहे.सदरील शासन निर्णयामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होणार असून, बीड जिल्ह्यातील १००० ते १५०० आणि राज्य भरातील १५,००० शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. सुशिक्षित बेरोजगारांसाठी टीईटी किंवा टेट

परीक्षा घेऊन रिक्त जागा भरणे आवश्यक असताना कंत्राटी भरती करून गुणवंत व गरजवंत होतकरू डी एड बी एड धारकांवर अन्याय करणारे धोरण आहे, करीता सदरील शासन निर्णय रद्द करणे आवश्यक आहे, सेवानिवृत्त शिक्षक नियुक्त करून पुन्हा एक शिक्षकी शाळा करुन ग्रामीण भागातील शिक्षणाची नाळ तोडण्याचे काम सुरू आहे. कारण १५ मार्च च्या शासन निर्णयानुसार दहाच्या आतील पटसंख्या असणाऱ्या शाळांमधील दोन्ही शिक्षकांचे समायोजन होणार आहे. परिणामी हा प्रतिगामी शासन निर्णय मागे घेण्याची मागणी जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ यांनी केली आहे.

सदरील आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवत शासन निर्णय रद्द होत नाही तोपर्यंत सदरील आंदोलन असहकार आंदोलन चालवण्याचा निर्धार केल्याची माहिती जिल्हा कार्याध्यक्ष संजय ढाकणे ,जिल्हा महिला उपाध्यक्ष श्रीमती सुनिता पिचड यांनी दिली आहे. करीता बीड जिल्ह्यातील समस्त शिक्षक बांधवांनी सदरील आंदोलन यशस्वी करण्यासाठी सक्रीय सहभाग नोंदवण्याचे आवाहन शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, जिल्हा सरचिटणीस नरेश गंधगे, जिल्हा कार्याध्यक्ष संजय ढाकणे, जिल्हा महिला अध्यक्ष माधुरी कुलकर्णी ,जिल्हा महिला उपाध्यक्ष श्रीम. सुनिता पिचड,जिल्हा सदस्य सुभाष कंटाळे, आप्पासाहेब डोके, रणजीत शिंदे, विलास अनवणे,बीड तालुकाअध्यक्ष उद्धव घोडके, शिरूर तालुका अध्यक्ष लाकूळ मुळे, केज तालुकाध्यक्ष महादेव सुर्वे, जयराम मांगडे, अंबाजोगाई महादेव चव्हाण ,सुनील पवार, पाटोदा लक्ष्मण खेडकर, वडवणी तालुकाध्यक्ष प्रकाश मुळे, प्रीतम वाघमारे, संतोष कोळपकर, शांताबाई घोडके, संगीता घायाळ,जनाताई इंगळे, बालिका खवतड, रंजना फुंदे, श्रीमती दगडखेर, श्रीमती बटुळे, श्रीम. सुवर्णा आयाचित, श्रीम. माधवी गाढवे, श्रीम. प्रतिभा कुलकर्णी, भारत राठोड, बद्रीनारायण बादाडे, सुनील दशरथ, दीपक रुपदे, श्री. निळकंठ सर, नवनाथ राठोड, महादेव वाघमारे, श्री. डेंगे सर, भगवान माने, सुनील तांगडे, आदींनी केले आहे.

कार्यकर्त्यांचा निर्धार महामेळावा

पडघम:प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन घोषणा

माजलगाव/ पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्रात आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीचे बिगुल केव्हाही वाजवू शकते या अनुषंगाने छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी माजलगाव, धारूर व वडवणी येथील प्रमुख कार्यकर्त्यांची माजलगाव येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात बैठक आयोजित केली. या बैठकीवेळी उपस्थित असलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त करत असताना मोहनराव जगताप यांनी वरिष्ठ नेत्यांच्या कोणत्याही दबावांमध्ये न येता आगामी विधानसभा लढवावी अशी भावना व्यक्त केली. तसेच प्रत्येक वेळा मोहनराव जगताप यांच्या कार्यकर्त्यांनी दुसऱ्यांसाठी काम करायचे आमदार करायचे परंतु मोहनराव यांना संधी कधी मिळणार, वरिष्ठ नेत्यांचा मान ठेवून निवडणुकीमध्ये माघार किती वेळेस घ्यायची आणि कार्यकर्त्यांनी मतदारसंघ बाहेरील उमेदवारासाठी काम कधीपर्यंत करायचे अशी भावना व्यक्त करत मोहनराव जगताप यांना निवडणुकीच्या मैदानात उतरावे असे मत कार्यकर्त्यांनी

याठिकाणी व्यक्त केले.

यावेळी मोहनराव जगताप पुढे बोलताना म्हणाले मी मागील तीस वर्षापासून राजकारण करतो मागील चार टर्म मला दुसऱ्याला आमदार करण्यासाठी फिरावे लागले मला आज ना उद्या न्याय मिळेल या भावनेने मी दुसऱ्यांचे काम करीत राहिलो पण आता आगामी येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत मी जनतेसमोर जाणार असून मी मतदारसंघात पूर्ण वेळ उपलब्ध असून नेहमी मतदारसंघातील अडी अडचणी सोडविण्यासाठी तत्पर असतो. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत माझा पक्ष कोणताही असो अथवा अपक्ष लढण्याची वेळ आली तरी मी विधानसभा निवडणूक लढविणार असल्याचे या बैठकीत दरम्यान कार्यकर्त्यांना मोहनराव यांनी सांगितले.तसेच पुढे बोलताना म्हणाले येत्या २९ सप्टेंबर रोजी माजलगाव येथील जुना मोंढा मैदान येथे कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणावर निर्धार महामेळाव्याचे आयोजन करून या ठिकाणी विधानसभेचे रणसिंग फुंकणार असल्याचे या बैठकीवेळी त्यांनी घोषणा केली. या बैठकीला माजलगाव धारुर व वडवणी येथील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

तहसीलदार आहात का कलेक्टर?

बोंबला: केज तहसीलदारांवर जनता नाराज

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज नवनियुक्त तहसीलदार यांचा तोरा कलेक्टर पेक्षा जास्त आहे पन कमी नाही केजचे तहसीलदार स्वता तहसीलदार आहेत हे विसरल्या सारखे वागत आहेत कारण त्यांना केज तालुक्यातील नागरिकांनचे कामे करण्यासाठी केज तालुक्यातील प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी इतर कोणतेही काम असो काही समस्या असो संपूर्ण केज तालुक्याका सांभाळण्यासाठी प्रशासनाने तहसीलदार यांच्या कडे जबाबदारी दीलेली असते परंतु केजचे तहसीलदार यांना या गोष्टीचे भान राहीलेले नाही असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे केजचे तहसीलदार असे वागतात की कलेक्टर सुध्दा त्यांच्या सारखा वागत नाही बीड जिल्ह्याचे कलेक्टर फोन उचलतात पन केज तहसीलदार यांना फोन उचलायला वेळ नाही

तरी बीड जिल्ह्याचे कलेक्टर यांनी केजच्या तहसीलदारांना कलेक्टर पद द्यावे व त्यांनी तहसीलदार पदी काम करावे कारण केज तहसीलदार यांना जिल्ह्याचा कारभार बघता येईल कारण ते कलेक्टर पेक्षा कमी नाहीत कारण ते तहसीलदार असल्या सारखे वागत नाहीत तर कलेक्टर सारखे वागत आहेत त्यामुळे केज तहसीलदार साहेब असुन खोळबा नसुन ओळीबा या म्हणी प्रमाणे केज तहसीलदार यांचे काम झाले आहे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

बीडमध्ये मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यत!

राजेंद्र मस्के:शर्यतीसाठी नाव नोंदणी करा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने तळेगाव शिवार बीड येथे २९ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ०९.०० वा. मराठवाडा केसरी भव्य बैलगाडा शर्यत खुले मैदानाचे आयोजन केले आहे. प्रथम बक्षीस सोनालीका ट्रॅक्टर २६ क्झ सह आकर्षक रोख बक्षीस ठेवण्यात आले आहेत. बैलगाडा शर्यत शौकीन शेतकरी बांधवांनी रीतसर नाव नोंदणी करून, या शर्यतीत बहुसंखेने सहभाग घ्यावा. असे आवाहन शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

गतवर्षी प्रमाणे बीड येथे बीड – नगर हायवे, भोंडवे पेट्रोल पंपासमोर, तळेगाव ता. जि. बीड येथे सरळ धावपट्टीवर गट पद्धतीने ही शर्यत संपन्न होणार आहे. एका वेळी पाच किंवा सात गाड्यांचा एक गट असेल. खुले मैदान असल्यामुळे कोणतीही छकडी व कोणताही बैल वापरू शकता. शासकिय नियमानुसार शर्यत पार पडेल तर पंचांचा निर्णय अंतिम असेल. सोनालीका ट्रॅक्टर २६ क्झ सह पुढील आकर्षक रोख बक्षीस देण्यात येतील. द्वितीय बक्षीस – ५१,०००, तृतीय बक्षीस – ३१,०००, चौथे बक्षीस – २१,०००, पाचवे बक्षीस – ११,०००, सहावे बक्षीस – ७,०००, सातवे बक्षीस – ५,००० नोंदणीकृत स्पर्धकांनाच शर्यतीत सहभाग घेता येईल. संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय, बीड येथे नाव नोंदणी सुरु आहे. यासाठी १५०० रुपये फिस आकारली जात आहे. यासाठी खालील मोबाईल वर संपर्क करून ऑनलाई पद्धतीने नावनोंदणी करू शकता. अशी माहिती राजेंद्र मस्के मित्र मंडळाने कळवली आहे. ऑनलाई नाव नोंदणीकरिता संपर्क – अविनाश नवले– ९९२१११४९५४, ९१३०८८७८८८, अजय सावंत – ९३५९००५८७९

निवड झाल्याने जबाबदारी वाढली!

निवड: ॲड प्रकाश संसारे काँग्रेसच्या सल्लागारपदी

राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी येथील मा.मंत्री जलनायक आमदार बाळासाहेब थोरात यांचे कायम विश्वासू राहिलेले राहुरी येथील ड प्रकाश संसारे यांची अहमदनगर काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या कायदेशीर सल्लागार पदी नुकतीच निवड करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनुसूचित जातीविभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबिरे व अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष बंटी यादव यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राहुरी सह जिल्हा भरात चांगले काम केले.पक्षाची विचारधारा शोषित वंचित आणि दुर्लक्षित घटकांपर्यंत पोहोचविली. त्यांच्या कामाची पावती म्हणून त्यांना जिल्हा कमिटीवर कायदेशीर सल्लागार पदी विराजमान होण्याचा मान मिळाला. तशा आशयाचे पत्र त्यांना जिल्हाध्यक्ष बंटी यादव यांनी देउन उमेदीने काम करण्याची संधी दिली.त्यांच्या निवडीचे अभिनंदन आमदार बाळासाहेब थोरात डॉ.सुधीर तांबे आमदार सत्यजित तांबे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या प्रदेश उपाध्यक्ष प्रियंका रणपिसे,संगमनेर युवक काँग्रेसचे अध्यक्ष जयश्री थोरात, प्रदेश काँग्रेसचे महासचिव संजय भोसले,आदींनी केले त्यांच्या निवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अस्मानी | पंचनामे होईना शेतकरी हतबल

अतिवृष्टीच्या नुकसानीची भिस्त

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यात झालेल्या दोन आणि तीन सप्टेंबरला झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे अद्यापही पंचनामे न झाल्याने आता तीस सप्टेंबरला जाहीर होणाऱ्या नजर अंदाज आणेवारीवर नुकसानीची भिस्त अवलंबून आहे अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे अद्यापही रखडलेले असून सोयगाव तालुक्यात अतिवृष्टीने ७२ गावात १५ हजार ७३७ हेक्टर वर कापूस मका सोयाबीन मूग आणि उडीद या पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचा संयुक्त अहवाल कृषी महसूल आणि पंचायत यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिला आहे मात्र या नुकसानीचे अहवाल वर अद्यापही पंचनाम्यचा निर्णय घेतलेला नाही त्यामुळे तलाठी कृषी सहायक आणि ग्रामसेवक शेतकऱ्यांच्या बांधावर फिरकले



नाही दरम्यान महसूल कडून खरिपाच्या पिकांची नजर अंदाज आणेवारी तीस सप्टेंबर ला जाहीर करण्यात येणार असून या नजर अंदाज आणेवारी पन्नास पैशांच्या खाली जाहीर झाल्यास पंचनामे करण्यात येतील नजर अंदाज आणेवारी वर खरीप पिकविम्याची मंदार अवलंबून आहे दरम्यान पिकविम्या कंपनी च्या पोर्टल वर ७२ तासांच्या आत २२०८ नुकसानीच्या तक्रारी शेतकऱ्यांनी नोंदविल्या आहेत महसूल व कृषी विभागाकडून नजर अंदाज आणेवारी ची पूर्वतयारी सुरू असून पीकविमा कंपनी कडून शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारींचे पडताळणी हाती घेण्यात आली आहे.

आणेवारीसाठीपैसेवारी, ग्रामसमित्या स्थापन नाही

सोयगाव तालुक्यातील ८७ गावात अद्यापही ग्रामसमितिच्या पैसेवारी समित्या स्थापन करण्यात आलेल्या नाही या ग्रामसमितीचा अध्यक्ष सरपंच तर सदस्त सचिव तलाठी असतो परंतु अद्यापही नवीन ग्रामसमिती पैसेवारी समित्या सोयगाव तालुक्यात स्थापन झालेल्या नाही त्यामुळे नजर अंदाज आणेवारी वर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

स्नो मॉन्ट ब्लँक पुणे सिटीचे लोकार्पण!

पुणे /पुण्यभूमी प्रतिनिधी

कोविड काळात सर्व संपर्क ऑन लाईन होता,तेव्हा उद्योजकांनी मदतीसाठी परस्पर संपर्कासाठी स्नो ग्लोबल बिझनेस कम्युनिटीची स्थापना केली होती. कोविड संपल्यानंतर ही ते कार्य सुरु राहिले व वाढत गेले. आज याचे २३ देशात २५०० सदस्य आहेत.याची सुरुवात डॉ.दीपक तोष्णीवाल यांनी केली होती. आज या संस्थेच्या स्नो मॉन्ट ब्लँक पुणे सिटी शाखेचे उद्घाटन माजी इन्कम टॅक्स कमिशनर के. एन बोरा यांच्या हस्ते करण्यात आले. वायसीएम डेक्कन येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पुढील पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष डॉ. दीपक तोष्णीवाल. आफरीन खान यांची डेप्युटी मेयर पदी, प्रवीण हेबारे यांची अध्यक्षपदी, देवाशिष कनोजिया उपाध्यक्षपदी, तर योगिनी वैद्य यांची खजिनदारपदी निवड करण्यात आली. विविध क्षेत्रांतील सुमारे ५० उयोजक या प्रसंगी उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना के.एन बोरा यांनी उद्योजकांनी परस्परांशी स्पर्धा मैत्रीपूर्ण व परस्पर सहकार्याने केल्यास उद्योग व्यवसायाची वाढ मोठ्या प्रमाणात होते असे प्रतिपादन केले.

सुविचार -आत्मनिर्भरतेमुळेच आत्मसन्मान मिळत असतो, याची आपल्याला जाणीव नसते.

अनावश्यक आणि अव्यवहार्य!

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काही लाडक्या स्वप्नांपैकी एक स्वप्न संपूर्ण देशात सगळ्या म्हणजे लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेणे हे आहे. त्या स्वप्नाच्या पूर्ततेच्या दिशेने एक पाऊल टाकण्यात आले आहे. 'एक देश एक निवडणूक' या योजनेच्या संदर्भात अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा अध्यक्षतेखालील या समितीने नुकताच आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर केला होता. त्यानंतर तो अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात आला आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने 'एक देश एक निवडणूक' ही संकल्पना सादर करणाऱ्या या अहवालाला मान्यता दिली. वरकरणी पंतप्रधान मोदींची संकल्पना आकर्षक वगैरे वाटत असली तरी भारतासारख्या खंडप्राय देशात अशा प्रकारे एकाच वेळी सगळ्या निवडणुका घेणे कितपत व्यवहार्य ठरते याबाबत अनेकांची वेगळी मते आहे. ही संकल्पना पुढे मांडताना प्रामुख्याने दोन तर्क देण्यात आले होते. एक तर एकाच वेळी सगळ्या निवडणुका घेण्यात आला तर वारंवार निवडणुका घेण्यामुळे जो काही पैशाचा अपव्यय होतो तो टाळता येईल आणि दुसरे म्हणजे निवडणूक काळात आचारसंहिता लागत असल्याने विकास कामांवर त्याचा परिणाम होतो. ही आचारसंहिता एकाच वेळी अंमलात आली उर्वरित कालावधीत विकास कामांना आडकाठी राहणार नाही. ही योजना जरी एक देश एक निवडणूक या नावाने प्रचारित केली जात असली तरी या संदर्भात जो अहवाल सादर करण्यात आला त्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेण्यात याव्यात आणि त्यानंतर शंभर दिवसांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्या अशी सूचना करण्यात आली आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकादेखील देशभर एकाच वेळी घेण्यात याव्या असेही हा अहवाल सांगतो. देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे महत्त्व लक्षात घेता त्या निवडणुका वेगळ्या होत असल्यामुळे मुळात एक देश एक निवडणूक ही संकल्पनाच इथे बाद ठरते. पैशाचा अपव्यय हा मुद्दा असता तर पैशाचा पाऊस पाडून पक्ष फोडण्याचे आणि सरकारे पाडण्याचे उद्योग या लोकांनी केले नसते. चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकाशिवाय महाराष्ट्रातील जवळपास २८ महापालिकांसह दोनशेहून अधिक नगरपालिका निवडणुका एकत्रच घेऊन हा प्रयोग यशस्वी होऊ शकतो, हे दाखविता आले असते; परंतु भाजपाला सोईचे नाही म्हणून या सगळ्या निवडणुका स्वतंत्र घेतल्या जात आहेत. अशा परिस्थितीत सरकारच्या नियतीवर विश्वास कसा ठेवायचा? निवडणुकीनंतर कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही तर त्यावर काय पर्याय असावा या संदर्भात भाष्य करताना या अहवालात आघाडी सरकार हा पर्याय सांगण्यात आला आहे, आघाडी करूनही एखादे सरकार पाच वर्षे टिकले नाही तर पुन्हा निवडणुका असे हा अहवाल म्हणतो. सध्याच्या लोकशाहीत सत्ताधाऱ्यांवर अविश्वास ठराव आणून आहे ते सरकार पाडण्याची सुविधा विरोधकांस आहे. त्या सुविधांचा वापर करून भाजपने कसे राजकारण केले हे अवघ्या देशाला माहीत आहे. राज्याराज्यांतील सत्ताधारी पक्ष फोडून आपले सरकार बनविण्याचा खेळ भाजपने मागील काही वर्षात केला आहे. 'एक देश एक निवडणूक' ही कल्पना या अशा पक्षफोडीस अधिक चालना किंवा उत्तेजन देणारी आहे. एखाद्या राज्यात अविश्वास ठरावाद्वारे सरकार पडले आणि विरोधकांनाही सरकार स्थापन करता आले नाही तर जसे जमेल तसे सरकार स्थापन करणे आणि उर्वरित कार्यकाळ पूर्ण करणे, तेही शक्य झाले नाही तर पुन्हा निवडणुका; परंतु या निवडणुका नंतर जे कोणत्या सरकार स्थापन होईल स्थापन होईल त्याचा कार्यकाळ मात्र सार्वत्रिक निवडणुकीपर्यंतच अशी तरतूद या अहवालात सुचविण्यात आली आहे. खरेतर निवडून आलेल्या सरकारला पाच वर्षांची मुदत मिळायला हवी, राजकीय घडामोडींमुळे एखादे सरकार मध्येच कोसळले आणि पर्यायी सरकार बनू शकले नाही तर पुन्हा निवडणूक घ्यायची; परंतु अशा मध्यावधी निवडणुकीत विजयी झालेल्या सरकारला फक्त उर्वरित मुदतच घायची. नंतर पुन्हा निवडणूक, कारण तोपर्यंत देशातील सार्वत्रिक निवडणुकीची वेळ आलेली असेल. ही कल्पना अतिशय अव्यवहार्य अशीच आहे. एखादा राजकीय पक्ष फक्त दोन वा दीड वर्षाच्या सत्तेसाठी निवडणुका लढवण्यास कसा तयार होईल? या सरकारने या आधी 'एक देश एक कर' अशी घोषणा करत 'वस्तू व सेवा कर' (जीएसटी) आणला. आज सात वर्षे आणि ५४ बैठकांनंतरही त्याचा गुंता सरकारला सोडवता आलेला नाही. त्यात आता आणखी एका 'एक देश.....' ची भर पडू शकते.

कथानकाचे कथानक.....!

भाजपने लोकसभा निवडणुकीतील निराशाजनक कामगिरीचे विश्लेषण करताना विरोधकांच्या खोट्या कथानकाला दोष दिला होता. विरोधकांचे खोटे कथानक यशस्वी ठरले असे भाजपचे मत आहे. त्यामुळे या पुढच्या काळात विरोधकांच्या खोट्या कथानकाचा बुरखा फाडण्याचे काम आपल्याला करावे लागेल, असे भाजप नेत्यांचे म्हणणे आहे. विरोधकदेखील एकदा यशस्वी ठरलेल्या ब्रह्मास्त्राचा पुन्हा वापर करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळेच अलीकडील काळात पुन्हा एकदा महाराष्ट्रातील उद्योग गुजरातमध्ये पळवले जात असल्याची आवई विरोधकांकडून उठवली जात आहे. खरे तर ही आवई नसून काही प्रमाणात वस्तुस्थिती आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील अनेक उद्योगधंदे व कारखाने गुजरातला गेल्याचे पाहायला मिळाले आहे. त्यामुळे हा मुद्दा पुन्हा एकदा त्रासदायक ठरू शकतो हे लक्षात घेऊन भाजप नेत्यांनी या मुद्यावर आतापासूनच आक्रमक भूमिका घ्यायला सुरुवात केली आहे. राज्यातील उद्योगधंदे राज्याबाहेर गेले नाहीत असा दावा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. उद्योग महाराष्ट्राबाहेर जाणे हे विरोधकांनी तयार केलेले नरेटिव्ह (खोटे कथानक) आहे. विरोधक आता तोंडावर पडले आहेत, असा आरोप फडणवीसांनी केला; परंतु एकीकडे फडणवीस असा दावा करत असतानाच पुन्हा एकदा राज्यातील एक उद्योग राज्याबाहेर गेल्याची बातमी समोर आली आहे. नागपूरमध्ये सोलर पॅनल प्रकल्प येणार होता. या प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रात १८ हजार कोटींची गुंतवणूक होणार होती. हा प्रकल्प राज्याबाहेर गेल्याची बातमी आहे. फडणवीसांनी विरोधकांवर टीका करताना म्हटले होते की विरोधी पक्ष सातत्याने महाराष्ट्राची बदनामी करत आहे. रिन्यू पॉवर प्लान्ट महाराष्ट्रातून गुजरातला गेला असा अपप्रचार त्यांनी केला. मात्र, आता रिन्यू पॉवर प्लान्ट कंपनीने एक निवेदन जारी करीत आपण महाराष्ट्रातच राहणार आहोत, असे स्पष्ट केले. त्याचा आधार घेत फडणवीसांनी विरोधकांच्या अपप्रचारावर टीका केली. अर्थात यात नक्की खरे कुणाचे हा संशोधनाचा विषय आहे. एक मात्र खरे की यापुढे विधानसभा निवडणुकीपर्यंत हा खऱ्या आणि खोट्या कथानकांचा कलगितुरा तसाच रंगत राहणार आहे.

आंतरराष्ट्रीय

अजित डोवाल आणि पुतीन यांच्या भेटीचा अन्वयार्थ!

डॉ. मंगेश गो.आचार्य
8550971310
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी सेंट पीटर्सबर्ग येथे १२ सप्टेंबर २०२४ रोजी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेतली. ही भेट विशेष महत्त्वाची ठरते, कारण ती अशा काळात झाली आहे ज्या काळात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिया आणि युक्रेनचे दौरे पूर्ण केले आहेत. या भेटीचा अन्वयार्थ आणि त्याचे वैश्विक राजकारणावर काय परिणाम होऊ शकतात, यावर विस्तृत चर्चा करणे अत्यंत आवश्यक आहे.

डोवाल आणि पुतीन यांची बैठक, रशियाच्या लांबलेल्या संकटानंतर आणि भारताने युक्रेनमध्ये शांतता प्रक्रिया सुरू करण्याच्या प्रयत्नानंतर झाली. पंतप्रधान मोदींच्या युक्रेन दौऱ्यावरून, ज्यामध्ये त्यांनी युक्रेनचे राष्ट्रपती वोलोडिमिर झेलेन्स्की यांच्याशी संवाद साधला, या भेटीसंदर्भात चर्चा करण्यात आली. मोदींच्या दौऱ्यादरम्यान त्यांनी युक्रेनच्या संघर्षाच्या समाधानाच्या दृष्टीने भारताची भूमिका स्पष्ट केली होती आणि या भूमिकेचा विस्तार डोवाल आणि पुतीन यांच्या चर्चेत करण्यात आला.

डोवाल यांनी पुतीन यांना पीएम मोदींच्या युक्रेन दौऱ्याची माहिती दिली. डोवाल यांनी स्पष्टीकरण दिले की, भारताचे पंतप्रधान मोदी यांनी त्यांना पुतीन यांच्याशी त्यांचे संवाद स्पष्ट करण्यासाठी विशेषतः येथे पाठवले. या बैठकीत पुतीन यांनी भारत-रशिया द्विपक्षीय संबंधांच्या सुरक्षेशी संबंधित मुद्यांवर चर्चा केली. याशिवाय, डोवाल यांनी युक्रेनमधील संघर्ष संपवण्यासाठी भारताची भूमिका आणि दृष्टिकोन स्पष्ट केला.

रशिया आणि भारत यांचे संबंध ऐतिहासिकदृष्ट्या मजबूत आहेत, आणि युद्धाच्या काळातही दोन्ही देशांनी आपल्या व्यापार संबंधांना चालना दिली आहे. भारताने युद्धादरम्यान रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी केले आहे, आणि हा आर्थिक संबंध आणखी दृढ करण्याच्या दिशेने प्रयत्न चालू आहेत. रशियाच्या दृष्टीने भारत हा एक महत्त्वाचा सहयोगी देश आहे आणि भारताच्या भूमिका युद्धाच्या स्थितीत शांततेसाठी महत्त्वाची ठरू शकते.

युक्रेनमध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर भारताने कोणताही स्पष्ट शांतता प्रस्ताव दिलेला नाही. तथापि, भारताने संघर्ष कमी करण्यासाठी आणि मानवतावादी मदतीसाठी सक्रिय भूमिका घेतली आहे. युक्रेनच्यासंदर्भात भारताच्या द्विपक्षीय भूमिकेचे एक उदाहरण म्हणजे पंतप्रधान मोदींचा झेलेन्स्की यांच्याशी संपर्क आणि युक्रेनच्या संघर्षाच्या संदर्भात समन्वय साधण्याचे प्रयत्न.

रशिया-युक्रेन संघर्षाचा ठोस समाधान मिळवण्यासाठी, पुतीन यांनी सांगितले की, त्यांनी युक्रेन सरकारच्या प्रतिनिधींशी संभाव्य शांतता चर्चेसाठी सर्व निकषांवर चर्चा केली आहे. यामुळे, भारताच्या भूमिका आणखी महत्त्वाची ठरते, विशेषतः ज्या पद्धतीने भारताने रशिया-युक्रेन संघर्षाच्या शांततेसाठी विचार केला आहे.

डोवाल यांचा रशिया दौरा चीनच्या दृष्टिकोनातून देखील महत्त्वाचा आहे. भारत आणि चीन यांच्यातील द्विपक्षीय संबंध अलीकडेच तणावात आहेत, आणि डोवाल यांनी रशियाच्या दौऱ्यात चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा केली. यामध्ये सीमारेषेवरील शांतता आणि लष्करी स्थगनाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. यामुळे, भारत-चीन संबंध सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

रशिया-युक्रेन संघर्ष जगभरातील आंतरराष्ट्रीय राजकारणात एक महत्त्वपूर्ण वळण आणणारा मुद्दा आहे. भारत या संघर्षात तटस्थ भूमिका घेताना दिसत आहे; परंतु याचे गहन विश्लेषण केल्यास भारताच्या कूटनीतिक दृष्टिकोणात एक सावध आणि संतुलित दृष्टिकोण स्पष्टपणे दिसून येतो.

मुत्सद्देगिरीचे तीन स्तर असतात. ज्यात भारतीय सरकारने या संकटात एका तटस्थ; परंतु प्रभावी भूमिकेची निवड केली आहे. भारताने युक्रेनवरील आक्रमणाच्या संदर्भात थेट सार्वजनिक घोषणा न करताही, रशिया आणि युक्रेनच्या दोन्ही देशांशी सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्यातील भेटी याचा स्पष्ट उदाहरण आहे. पीएम मोदींच्या रशिया दौऱ्यावर तेथे त्यांनी पुतीन यांना मिठी मारली, तर युक्रेन दौऱ्यावर झेलेन्स्कीला मिठी मारली. यामुळे भारताच्या संतुलित कूटनीतिक धोरणाचे प्रतिनिधित्व होत आहे.

भारताने युद्धादरम्यान रशियाशी व्यापार चालू ठेवला असून, युक्रेनसाठी मानवीय मदत प्रदान केली आहे. भारताने रशियाकडून विक्रमी पातळीवर तेल खरेदी केले, पण दुसरीकडे युक्रेनला मानवीय मदत पोचवली. भारताच्या परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी याविषयीच्या पत्रकार परिषदेत म्हटले की, 'जगाच्या ज्या भागात आपण राहतो, तिथे लोक भेटल्यावर एकमेकांना मिठी मारतात.' हे भारताच्या सांस्कृतिक दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करते.

आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताची भूमिका युक्रेनवरील प्रस्तावांपासून अंतर राखताना दिसली आहे. याने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की भारताच्या कूटनीतीचा केंद्रबिंदू साधारणतः पारंपरिक राजकीय वर्तनापासून दूर आहे आणि एक सतत स्थिर, विचारशील दृष्टिकोन स्वीकारत आहे. रशिया आणि भारत यांच्या व्यापारातील वाढीचे संकेत भारताच्या कूटनीतिक धोरणाची यश दर्शवतात. दोन देशांमधील व्यापार सध्या ५० अब्ज डॉलर्सच्या आसपास आहे आणि हा वाढीचा ट्रेंड आगामी काळात १०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

अशा परिस्थितीत, भारताच्या कूटनीतिक यशाचे मूल्यांकन करताना युक्रेन आणि रशिया यांच्याशी संतुलित संबंध राखणे भारताच्या बाह्य धोरणाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भारताचे साधारण आणि अंतर्गत सांस्कृतिक तत्त्वे यांची एकत्रित भूमिका या संकटात एक प्राथमिक दृष्टीकोण प्रस्तुत करत आहे, जे त्याच्या आंतरराष्ट्रीय कूटनीतीला एक वेगळा आणि प्रभावी पैलू प्रदान करते.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रशिया दौऱ्यानंतर एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे- रशियाने आपल्या सैन्यात भरती झालेल्या ४५ भारतीयांची सुटका केली आहे. यामध्ये पंतप्रधान मोदींच्या भेटीपूर्वीच १० भारतीयांची सुटका करण्यात आली होती. या घटना भारत-रशिया संबंधातील कूटनीतिक यशाचे द्योतक आहेत, पण त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय संबंधांच्या गुंतागुंतीचे चित्रही उघडतात.

पंतप्रधान मोदींच्या रशिया दौऱ्याचे अध्ययन करताना, त्याच्यातील कूटनीतिक सूक्ष्मता आणि कार्यक्षमता याचे महत्त्व अधोरेखित होते. रशियाच्या सैन्यात भारतीय नागरिकांची भरती एक गंभीर समस्या होती, ज्याचा भारताच्या कूटनीतिक यंत्रणेवर दबाव निर्माण झाला. या मुद्यावर पंतप्रधान मोदींनी रशियन अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यासोबत चर्चा केली, आणि याचा परिणाम म्हणून भारतीय नागरिकांची सुटका करण्यात आली.

महत्त्वाचे म्हणजे पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यानंतर, रशियाच्या सैन्यातून ४५ भारतीयांची सुटका झाल्याचे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी जाहीर केले. या ४५ भारतीयांपैकी १० जणांची सुटका मोदींच्या भेटीपूर्वीच करण्यात आली होती, तर बाकीचे भारतीय मोदींच्या भेटीनंतर सोडले गेले. याचा संकेत म्हणजे, भारतीय कूटनीतीने यशस्वीपणे आपले मुद्दे उचलले आहेत आणि त्यावर प्रभावीपणे कार्यवाही केली आहे.

रशियात अजूनही सुमारे ५० भारतीयांच्या असण्याची माहिती आहे, ज्यामुळे या समस्येच्या पूर्ण निरसनासाठी अजून काही प्रयत्नांची आवश्यकता आहे. पंतप्रधान मोदींच्या भेटीदरम्यान रशियन सैन्यात भारतीयांच्या उपस्थितीचा मुद्दा थेटपणे उपस्थित केला गेला, ज्यामुळे रशियाच्या सत्ताधाऱ्यांनी या विषयावर लक्ष केंद्रीत केले आणि तत्परतेने उपाययोजना केल्या. रशिया आणि भारत यांच्यातील या कूटनीतिक यशाने दर्शवले की, भारताच्या परराष्ट्र धोरणात त्याच्या नागरिकांच्या सुरक्षेचा आणि हिताचा गंभीर विचार केला जातो. तसेच, कूटनीतिक माध्यमातून समस्या सोडवण्याची क्षमता भारतीय शासनाच्या कार्यक्षमता आणि प्रभावशीलतेचे प्रतीक आहे. परंतु, हा मुद्दा आंतरराष्ट्रीय संबंधांची गुंतागुंत उजागर करतो. एकाचवेळी रशिया आणि भारत यांच्यातील परस्पर हितांची जुळवणी आणि नागरिकांच्या सुरक्षेची काळजी हे दोन महत्त्वाचे मुद्दे असतात. पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, कूटनीतिक यशाच्या मागे सुसंगत आणि प्रभावी संवादाची महत्त्वाची भूमिका असते.

डोवाल आणि पुतीन यांची भेट हे भारताच्या आंतरराष्ट्रीय कूटनीतीतील महत्त्वाचे पाऊल आहे. युक्रेनमधील संघर्षाच्या संदर्भात भारताची भूमिका स्पष्ट करताना, रशियाच्या भूमिकेचा विस्तार करताना, आणि चीनशी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करताना, हे भेटीचे महत्त्व आणखी वाढते. भारताची संतुलित भूमिका आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीतील कूटनीती यावर आधारित, डोवाल आणि पुतीन यांची बैठक जागतिक राजकारणात एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरते. त्यामुळे, भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा आणि युक्रेन-रशिया संघर्षाच्या शांततेसाठी भारताच्या प्रयत्नांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर कसा स्वीकार होतो, यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम

प्रासंगिक

'बाप्पांना' निरोप डीजे दणदणाटात-लेझरच्या झगमगाटात!

अनंत बोरसे
9158495037

अनंत चतुर्दशीला राज्यभर आपल्या लाडक्या बाप्पाचा भक्तिभावाने निरोप दिला गेला, मात्र यावेळी दरवर्षी पोलिसांनी केलेल्या सूचना, डीजेचा आवाज, याबाबत न्यायालयाच्या आदेशाचे अनेक ठिकाणी पालन केले नाही. त्याचबरोबर विसर्जन मिरवणुकीच्या वेळा याचेदेखील पालन झाले नाही. पुण्यात अठ्ठावीस तास विसर्जन मिरवणूक चालली तर मुंबईत लालबागच्या राजाचे दुसऱ्या दिवशी सकाळी विसर्जन झाले, अनंत चतुर्दशीला विसर्जन झाले पाहिजे, याचे अनेक ठिकाणी पालन झाले नाही. काही दिवसांपूर्वी लेझरच्या प्रखर झोतामुळे एका तरुणाच्या डोळ्यातून रक्त येण्याची तसेच याच मिरवणुकीत बंदोबस्तावर असलेल्या काही पोलिसांना त्रास झाल्याची घटना घडली होती. लेझरच्या वापरावरून पुण्यात एका मंडळाचे कार्यकर्ते आणि पोलीस यांच्यात वाद झाला. तर भिवंडी जळगाव (जामोद) हे ताणतणाव निर्माण झाला. जिंतूर येथे डीजेच्या आवाजाने एकाचा मृत्यू तर दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. अमरावती, नाशिक, नगर, अचलपूर येथे विसर्जनाच्या वेळी अनेकांचे बुडून मृत्यू झाले. आता पोलीस, डीजे चालक, मंडळांचे कार्यकर्ते यांच्यावर गुन्हे दाखल करीत आहेत, सांगलीमध्ये ३३ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, नंतर पुढे काय?. अनेक विसर्जन मिरवणुकीत चोरांनीदेखील आपले चौर्यकौशल्य दाखवले.

ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी राज्यात 'ध्वनिप्रदूषण नियमन व नियंत्रण कायदा २०००' देखील मंजूर करण्यात आला आहे. यासाठी वेळोवेळी जनजागृती केली जाते, कायद्याचा बडगा उगारला जातो तरीदेखील जिकडेतिकडे पर्यावरणाची समस्या गंभीर होत चालली आहे. ध्वनिप्रदूषण, हवेतील प्रदूषण या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने धार्मिक कार्यक्रम, वैयक्तिक लग्न समारंभ, सार्वजनिक कार्यक्रम करताना आवाजाची मर्यादा घालून दिली आहे, त्याचबरोबर प्रखर झोताचे एलईडी लाईट वापरावर निर्बंध घातले आहे. शाळा, हॉस्पिटल परिसरात कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविणे, मोठ्या आवाजाचे फटाके फोडण्यास बंदी आहे, मात्र मिरवणुकीच्या वेळी याचे भान कुणीही बाळगत नाही. ध्वनिप्रदूषण, लेझर लाईट यामुळे होणारे दुष्परिणाम याचे भान सगळ्यांनी बाळगण्याची गरज आहे. दरवर्षी सणासुदीला उत्साहाच्या भरात भान राखले जात नाही त्यामुळे अनेकदा दुर्घटना घडतात आणि अनेकांचे जीव जातात तर अनेकांना कायमचे अपंगत्व येते. मिरवणुकीच्या काळात तासन्तास, काही ठिकाणी रात्रभर मिरवणुका चालतात, त्यामुळे अर्थातच, पोलीस, प्रशासनावर ताण पडतो, वाहतूक कोंडी होते, त्याचबरोबर ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणावर होते. गणेशोत्सव साजरा होत असताना अनेक ठिकाणी ध्वनिप्रदूषण होते. डीजे डॉल्बीचा आवाज किती मर्यादेपर्यंत असावा याबाबत कोर्टाचे निर्देश आहेत. मात्र, दुर्दैवाने त्याचे पालन करण्याची मानसिकता आणि इच्छाशक्ती कोणाचीच नाही, हा दरवर्षीचा अनुभव आहे.

रस्ते, चौक अडवून विनापरवाना मंडप उभारणे हा जणू हक्कच असल्याची भावना अनेकांची भावना झाली आहे. वाहतूक कोंडी, जनतेची अडचण लक्षात घ्यावी अशी कोणाचीच मानसिकता नसते. ज्यांनी या गोष्टी वेळीच रोखायला हव्यात त्या पोलीस, प्रशासन सारख्या यंत्रणा बघ्याची भूमिका घेतात नंतर तोंडदेखल्या कारवाईचा फार्स केला जातो. राजकीय पक्ष, नेते केवळ मतपेटीचा विचार करून कठोर भूमिका घेत नाही.

लहान बालके, वृद्ध मंडळी यांना काही त्रास होत असेल याचा विचार कोणाच्याही मनाला शिवत नाही. आपणच आपल्या धार्मिक सणांचे पावित्र्य, गांभीर्य राखत नसून तर इतरांना का दोष द्यायचा? 'मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव' अशा पद्धतीने धार्मिक उत्सव साजरे होऊ नये. आता याबाबत जनजागृती, सामुदायिक प्रयत्नांची गरज आहे. राजकीय पक्ष, नेते केवळ मतपेटीचा विचार करून कठोर भूमिका घेत नाही. अनेक जिल्ह्यात डीजे, लेझर लाईटवर बंदी घातली गेली ती स्वागतार्हच आहे, पण त्याचे काटेकोरपणे पालन झाले पाहिजे. पोलिसांचा वचक, ना कायद्याची धाक, ना शिक्षेची भीती कोणालाही राहिलेली नाही. धार्मिक सण उत्सव साजरे झालेच पाहिजे, सणांचा आनंद घेतलाच पाहिजे, संस्कृती जपली गेलीच पाहिजे, धार्मिकता जपली गेली पाहिजे. डीजेच्या दणदणाटाच्या, लेझरच्या झगमगाटाचा मोह आवरत आटोपशीर विसर्जन मिरवणूका काढून धार्मिक सण, उत्सव साजरे झाले पाहिजे. केवळ गणेशोत्सवच नव्हे तर इतर धार्मिक सणांबाबत डीजे बंदी लेझरचा वापर याबाबत हेच निर्बंध लागू असतील हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

शहापूर, जि. ठाणे

चळवळ

शाहीर अमृतबुवा बावस्कर

प्रा.डॉ. इसादास भडके
9096364886
erbfes@gmail,com

दलितांना आणि पिचलेल्यांना अंधारातून प्रकाशात आणण्याचे ऐतिहासिक आणि महत्त्वाचे कार्य बाबासाहेबांनी केले. दलितांना आणि समग्र मानवजातीला नवी वाट दाखवली. नवीन दिशेने जाण्याचा मार्ग दिला. बाबासाहेबांनी अनंत वेदना आणि दुःख सोसले. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मानवजातीसाठी झटले. दलित जन हाच त्यांचा संसार होता. संशोधिका डॉ.प्रतिभा वाघमारे - खोबरागडे म्हणतात की, 'भारतीय संस्कृतीत मुरलेली अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्वतःचा संसार म्हणजे दलितांचा उद्धार' असे समीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारले.

शाहीर अमृतबुवा बावस्कर यांचा जन्म खान्देशात रावेर या गावी १९२७ मध्ये झाला. त्यांना बालपणापासून गाण्याची आवड होती. त्यांच्या वडिलांचा मृत्यू बालपणीच झाला. वडील गेल्यानंतर आईने काबाडकष्ट करून शिकविले. सातवीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. पुढे शाहीर बावस्कर मोलमजुरी करून कुटुंबाची जबाबदारी पार पाडू लागले. पत्नीचे निधन, मुलाचे अपंगत्व त्यांच्या वाट्याला आले. आयुष्यातील दुःखाला वाट मोकळी करून देण्यासाठी त्यांनी गाण्याचा आश्रय घेतला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर १९३६-३७ साली रावेर तालुक्यातील सावद या गावी आले होते. शाहीर अमृतबुवा बावस्कर यांनी बाबासाहेबांची भेट घेतली. तिथूनच त्यांच्या जीवनाला नवीन वळण प्राप्त झाले आणि आंबेडकरी विचारांकडे ते आकृष्ट झाले. त्यांच्या लेखणीने आंबेडकरी विचारांचा ध्यास घेऊन ती शब्दबद्ध होऊ लागली आणि बाबासाहेब त्यांच्या लिखाणाचे सर्वस्व बनले. ते म्हणतात की, ''अरे फुटतील बारा वाटा अमृता तुला एक धैर्य पाहिजे आणि धैर्याचा खांब भीमबाबा यांचा संदेश पाहिजे, आणि भीमाच्या धोरणाचा स्वाभिमान पाहिजे.'' बाबासाहेब धैर्याचे प्रतीक आहेत. त्यांचा संदेश हा मौलिक असून बाबासाहेबांचे धोरण स्वाभिमानाला चालना देणारे आहे असा आशय शाहीर अमृतबुवा बावस्कर व्यक्त करतात. त्यांच्या लेखणाला बाबासाहेबांच्या विचारांचे तात्त्विक अधिष्ठान मिळाले आहे. 'विश्व हे घर आणि मूळ माहेर, समता नीती आधार, विषमतेला मारूनी टोला त्याने पाडली दातावर' ही बावस्कर यांची रचना विश्वाला घर मानणारी असून बाबासाहेबांनी समता नीती याद्वारे विषमतेचा पाडाव केला असे सूचित केले आहे. त्यांच्या काव्यात लोकांपर्यंत पोहचण्याचे सामर्थ्य आहे. बाबासाहेबांच्या विचारांनी जनजागृती करण्याचा त्यांनी सातत्यानी प्रयत्न केला. ''माझ्या भीमाने केला गं बाई दलितांचा उद्धार, अन् नऊ कोटी दलितजन हाच सोन्याचा संसार' यातून शाहीर अमृतबुवा बावस्कर यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा आलेखच मांडलेला आहे. दलितांना आणि पिचलेल्यांना अंधारातून प्रकाशात आणण्याचे ऐतिहासिक आणि महत्त्वाचे कार्य बाबासाहेबांनी केले. दलितांना आणि समग्र मानवजातीला नवी वाट दाखवली. नवीन दिशेने जाण्याचा मार्ग दिला. बाबासाहेबांनी अनंत वेदना आणि दुःख सोसले. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मानवजातीसाठी झटले. दलित जन हाच त्यांचा संसार होता. संशोधिका डॉ.प्रतिभा वाघमारे - खोबरागडे म्हणतात की, 'भारतीय संस्कृतीत मुरलेली अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी स्वतःचा संसार म्हणजे दलितांचा उद्धार असे समीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारले. जागतिक पातळीवर नावलौकिक मिळालेल्या जीवनाची साक्ष म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य होय. ही लोककवी अमृतबुवा बावस्कर यांची कविता लोकमनात खोलवर रूजली.' अशाप्रकारे बाबासाहेबांच्या त्यागमय जीवनाचे वास्तव अमृतबुवा बावस्कर यांनी अधोरेखित केले आहे.

शाहीर अमृतबुवा बावस्कर हे बाबासाहेबांच्या जीवनाला अस्मितेचे द्योतक मानायचे. त्यातूनच त्यांच्या कार्य आणि कर्तृत्वाला बळ मिळाले. अमृतबुवा बावस्कर यांची समग्र रचना ही समाजात आंबेडकर रूजविणारी आहे. ते आंबेडकरी चळवळीचा मैलाचा दगड ठरलेले आहेत.

वाचक विचार मंच

हा तर भक्तांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार

भारतातच नव्हे तर जगातील सर्वात श्रीमंत देवस्थानांपैकी एक असलेल्या तिरुपती बालाजी व्यंकटेश्वरच्या मंदिरात तिरुमला तिरुपती देवस्थानमद्वारे देण्यात येणाऱ्या प्रसादाच्या लाडूंसाठी शुद्ध तुपाऐवजी प्राण्यांच्या चरबीचा वापर केला जात होता, असे वक्तव्य खुद्द आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केल्यामुळे कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेला तडा गेला आहे.

या संदर्भातील 'सेंटर ऑफ ॲनालिसिस अँड लर्निंग इन लाइव्हस्टॉक अँड फूड' या गुजरातच्या आनंद येथील नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाच्या प्रयोगशाळेच्या अहवालानुसार तिरुपती मंदिराच्या प्रसादाचे लाडू तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपात गोमांस, डुकराची चरबी आणि माशाचे तेल इत्यादी घटक आढळून आल्याचे म्हटले आहे. या अहवालाच्या सत्यतेवर प्रश्नचिन्ह असले तरी,

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी राजकीय हिशोब चुकता करण्यासाठी त्यांचे कट्टर राजकीय विरोधक असलेले माजी मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या काळात तिरुपती देवस्थानात असे प्रकार घडत होते असे म्हटल्यामुळे तिरुमलाच्या पावित्र्याला निश्चितच धक्का पोहोचला आहे. राजकारणाच्या गदारोळात एकमेकांची

संयुक्त राष्ट्रसंघ महासभेत पॅलेस्टाइनशी निगडित प्रस्तावावर मतदान

भारताने मतदानापासून राखले अंतर

वृत्तसंस्था

संयुक्त राष्ट्रसंघ : संयुक्त राष्ट्रसंघ महासभेत पॅलेस्टाइनशी निगडित प्रस्तावावर मतदान झाले आहे; परंतु भारताने यात भाग घेतला नाही. पॅलेस्टिनी क्षेत्रातील स्वतःचा अवैध कब्जा इस्रायलने १२ महिन्यांच्या आत हटवावा अशी मागणी या प्रस्तावाद्वारे करण्यात आली होती. १९३ सदस्यीय महासभेने हा प्रस्ताव संमत केला आहे. प्रस्तावाच्या बाजूने १२४ देशांनी तर विरोधात १४ देशांनी मतदान केले आहे. भारतासमवेत ४३ देशांनी या मतदानापासून अंतर राखले आहे.

मतदानात भाग न घेणाऱ्या देशांमध्ये ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, इटली, नेपाळ, युक्रेन आणि ब्रिटन सामील आहे. तर इस्रायल आणि अमेरिकेने या प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले आहे. पॅलेस्टाइनकडून निर्मित या प्रस्तावात इस्रायल सरकारची कठोर निंदाही करण्यात आली आहे. इस्रायलला स्वतःच्या कब्जातील पॅलेस्टिनी क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कुठल्याही प्रकारच्या उल्लंघनासाठी उत्तरदायी ठरविण्यात यावे असे प्रस्तावात म्हटले गेले होते.

पॅलेस्टिनी नागरिकांची ओळख जारी केली

दुसरीकडे गाझाच्या आरोग्य मंत्रालयाने इस्रायलच्या कारवाईत मारले गेलेल्या ३४,३४४ पॅलेस्टिनी नागरिकांची ओळख जारी केली आहे. मंत्रालयाने मृतांचे नाव, वय आणि ओळख क्रमांकाची एक यादी प्रकाशित केली आहे. या यादीत कारवाईत मारले गेलेल्या ८० टक्क्यांपेक्षा अधिक पॅलेस्टिनींची नावे सामील आहेत. तर यादीत सामील नावांसोबत इस्रायलसोबतच्या संघर्षात मारले गेलेल्या उर्वरित ७,६१३ लोकांची नावे जोडल्यास मृतांचा आकडा ४१ हजारांहून अधिक होणार आहे. त्यांचे मृतदेह रुग्णालयांमध्ये ठेवण्यात आले आहेत; परंतु त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही.

'सनातन धर्म रक्षा मंडळ' स्थापन करण्याची मागणी ; पवन कल्याण म्हणाले, 'कडक कारवाई करणार'

वृत्तसंस्था

हैदराबाद : तिरुपती व्यंकटेश्वर मंदिरातील प्रसादात भेसळ असल्याची पुष्टी झाली आहे. प्रसाद बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तुपात प्राण्यांची चरबी आढळून आली आहे. सत्ताधारी तेलुगु देसम पक्षाने (टीडीपी) दावा केला आहे की गुजरातस्थित पशुधन प्रयोगशाळेने या भेसळीची पुष्टी केली आहे. प्रसाद म्हणून वाटण्यात येणारे लाडू बनवण्यासाठी गोमांस चरबी, फिश ऑईल आणि पाम ऑइलचा वापर केला जात असल्याचे टीडीपीने म्हटले आहे. दरम्यान, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी सनातन धर्म रक्षा मंडळ स्थापन करण्याची मागणी केली आहे.

उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी या प्रकरणाबाबत सोशल मीडियावर सांगितले की, तिरुपती बालाजी प्रसादमध्ये प्राण्यांची चरबी (माशाचे तेल, डुकराचे मांस आणि गोमांस फॅट) मिसळली जात असल्याने आम्ही सर्वजण खूप त्रस्त आहोत. तत्कालीन वायसीपी सरकारने टीटीडीची स्थापना केली होती.

बोर्ड कठोर कारवाई करण्यासाठी वचनबद्ध आहे; परंतु मंदिरे आणि इतर धार्मिक प्रथा यांच्या अपवित्रतेशी संबंधित अनेक समस्यांवर प्रकाश टाकला आहे. ते पुढे म्हणाले, आता भारतातील मंदिरांशी संबंधित सर्व मुद्यांवर विचार करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर 'सनातन धर्म रक्षा मंडळ' स्थापन करण्याची वेळ आली आहे.

डब्ल्यूएएसपी-76 बी या ग्रहाचे तापमान 2000 अंश सेल्सिअस

वृत्तसंस्था



जिनिव्हा : युनिव्हर्सिटी ऑफ जिनिव्हाच्या वैज्ञानिकांनी अशाप्रकारचा ग्रह शोधला आहे, ज्याची कुणी कल्पनादेखील केली नव्हती. या ग्रहाचे नाव डब्ल्यूएएसपी-७६ बी आहे. येथील हवामान अत्यंत खराब आहे, येथे हवा असली तरी तिचा वेग अधिक आहे. हवेत लोहाच्या सूक्ष्म कणांचे प्रमाण अत्यंत अधिक आहे. दिवसा तेथे तापमान २००० अंश सेल्सिअस असते.

हा ग्रह स्वतःच्या ताऱ्यासोबत टाइडली लॉक्ड आहे, म्हणजेच जोडलेला आहे. याचमुळे याच्या चहुबाजूला जोरदार वारे वाहत असतात. यात लोहाच्या कणांचे प्रमाणदेखील अधिक आहे. येथील अधिक तापमानामुळे दिवसा लोहाचे कण वितळून या ग्रहाच्या पृष्ठभागावर पडत असतात. हा एक एक्सोप्लॅनेट आहे, म्हणजेच बाहेरील ग्रह. बाहेरील यासाठी कारण हा आमच्या सौरमंडळात नाही. १९९० पासून आतापर्यंत वैज्ञानिकांनी अशाप्रकारच्या ५२०० बाहेरील ग्रहांचा शोध लावला आहे. यातील अनेक गुरू आणि शनिसारखे मोठे ग्रह आहेत.

भारतीय तोफगोळे युरोपमार्गे युक्रेनमध्ये पोहचले; रशिया नाराज

देशोन्नती वृत्तसंकलन

कीव्ह : रशिया आणि युक्रेन युद्धाला आता सुमारे ३ वर्षांचा कालावधी झाला आहे. हा संघर्ष अद्याप शमण्याची चिन्हे नाहीत. याचदरम्यान या युद्धावरून धक्कादायक दावा करण्यात आला आहे. भारतीय शस्त्रास्त्र निर्मात्यांकडून विकण्यात येणारे तोफगोळे युरोपमार्गे युक्रेनमध्ये पोहोचले आहेत. रशियाच्या विरोधानंतरही भारताने या खरेदी-विक्रीला रोखण्यासाठी आतापर्यंत कुठलाच हस्तक्षेप केलेला नाही.

अनेक भारतीय आणि युरोपीय अधिकाऱ्यांसोबत सीमा शुल्क डाटानुसार रशियाच्या विरोधात युक्रेनच्या हल्ल्यांसाठी दारूगोळयाची ही निर्यात एक वर्षापेक्षा अधिक काळापासून होत आहे. पोक्रोवस्कमध्ये रशियन आक्रमण रोखण्यासाठी संघर्ष करत असलेल्या

युक्रेनमध्ये दारूगोळयाची मोठी कमतरता आहे. शस्त्रास्त्रांच्या निर्यातीवरून भारतीय नियमांच्या अंतर्गत शस्त्रास्त्रांचा वापर केवळ खरेदीदारच करू शकतात. रशियाने कमीतकमी दोनवेळा यासंबंधी मुद्दा उपस्थित केला असल्याचे भारतीय अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. जुलै महिन्यात रशियन विदेशमंत्री सर्गेई लावरोव्ह आणि विदेशमंत्री जयशंकर यांच्यात झालेल्या बैठकीत यासंबंधीचा मुद्दा उपस्थित झाला होता.

अंबादास दानवे यांचे थेट राज्यपालांना पत्र

देशोन्नती वृत्तसंकलन

नवी मुंबई : राज्याच्या पहिल्या महिला मुख्य सचिव म्हणून मान मिळवणाऱ्या सुजाता सौनिक यांना हटवण्याच्या हालचाली मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर सुरू असल्याची चर्चा अलीकडे सुरू होती. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना पत्र पाठवून याबाबत तत्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच, राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरून महायुती सरकारला लक्ष्य केले आहे.

गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव इकबाल सिंह चहल हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अत्यंत विश्वासू समजले जातात. राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर यांची

सुजाता सौनिक यांच्या बदली प्रकरण

निवृत्ती जवळ आल्यानंतर त्या पदावर आपली नियुक्ती करावी, अशी गळ चहल यांनी घातली होती, असेही सांगितले जाते. आपल्या या मित्राचा हट्ट पुरवण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांचे अत्यंत निष्ठावान समजल्या जाणाऱ्या मित्राने (महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन) पुढाकार घेतला आणि सुजाता सौनिक यांना निरोप पाठवून स्वतःहून या पदावरून बाजूला होण्याचा सल्ला दिला गेला, अशीही चर्चा होती. या पार्श्वभूमीवर आमदार अंबादास दानवे यांनी ट्विट केले आहे. मुख्य सचिव सुजाता सौनिक या शिस्तीच्या अधिकारी असून सरकारच्या कट प्रॅक्टिसला थारा न देणाऱ्या सौनिक यांच्यावर सरकारतर्फे आता राजीनाम्यासाठी दबाव टाकला जात आहे. तसे न केल्यास त्यांच्या पतीवर या न त्या मार्गाने खोटी कारवाई करण्याची तयारी सरकार करत आहे, असा दावा त्यांनी केला आहे. एकीकडे 'लाडकी बहीण' म्हणून राज्यात रोज इव्हेंट करायचे आणि दुसरीकडे सक्षम भगिनीला त्रास देण्यासाठी षडयंत्र रचायचे, असा कारभार सुरू आहे, असा आरोप करतानाच, असेच सुरू राहिले तर तत्वाने काम करणारे अधिकारी महाराष्ट्रात राहतील का? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

भारतीय लष्कराने सात आयईडी केले जप्त

इम्फाळ : भारतीय लष्कर आणि मणिपूर पोलिसांनी मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील बोंगजंग आणि इथम गावांच्या डोंगराळ भागात केलेल्या मोठ्या कारवाईत ७ सुधारित स्फोटक उपकरणे (आयईडी) जप्त केली आहेत. यामुळे मोठा अनर्थ टळला आणि अनेक निष्पाप लोकांचे प्राण वाचले. कोलकाता येथील ईस्टर्न कमांडचे मुख्यालय फोर्ट विल्यम येथून सांगण्यात आले आहे की, गुप्तचर माहितीच्या आधारे भारतीय लष्कर आणि मणिपूर पोलिसांच्या तुकड्यांनी वेगाने कारवाई केली आणि लष्कराच्या स्फोटक शोधक कुत्र्यांसह शोध मोहीम सुरू केली.

मतदान टक्केवारी वाढविणे आवश्यक

निवडणूक विभागाचे पक्षांना आवाहन

देशोन्नती वृत्तसंकलन

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी निवडणूक यंत्रणा प्रयत्नशील आहे. मात्र, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी अश्विनी जोशी यांनी सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांना केले आहे. मुंबईतील विविध मतदारसंघांमधील मतदार केंद्रांमध्ये झालेल्या सुसूत्रीकरणाची माहिती देण्यासाठी अश्विनी जोशी यांनी निवडणूक जिल्हा अधिकारी भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत मुंबई महापालिका मुख्यालयात गुरुवारी सायंकाळी बैठक घेतली आहे. त्यावेळी त्यांनी राजकीय पक्षांना आवाहन केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे, या दृष्टीकोनातून मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हा येथे मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. यामध्ये प्रत्येक मतदान केंद्राच्या ठिकाणी पूर्वी असणारी सरासरी १५०० मतदारांची संख्या ही आता सरासरी १२०० ते १३०० पर्यंत असणार आहे.

चंदीगड : हरियाणा विधानसभा निवडणुकीचा भाग म्हणून आज आम आदमी पार्टीने जगाधरी येथे भव्य रोड शो आयोजित केला होता. या रोड शोमध्ये दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल सहभागी झाले होते. केजरीवाल यांच्या उपस्थितीमुळे रोड शोमध्ये जनतेचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

ग्रीसमध्ये घर घेण्यासाठी भारतीयांची गर्दी

वृत्तसंस्था

ग्रीस : गेल्या काही दिवसांत ग्रीसमध्ये भारतीय गुंतवणूकदारांची वाढली आहे. येथे घरे खरेदी करण्यासाठी भारतीयांनी गर्दी केली आहे. जुलै ते ऑगस्ट दरम्यान ग्रीसमधील भारतीय गुंतवणूकदारांच्या मालमत्ता खरेदीत ३७ टक्क्यांनी वाढ झाली आहे, पण या मागचे कारण काय? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

१ सप्टेंबरपासून ग्रीसमध्ये महत्त्वाचे नियामक बदल होणार आहे. याआधी भारतीय गुंतवणूकदारांना येथील गोल्डन व्हिसा योजनेचा पुरेपूर लाभ

मालमत्ता खरेदीत ३७ टक्क्यांची वाढ

घ्यायचा आहे. गोल्डन व्हिसा योजनेंतर्गत कायमस्वरूपी घरे मिळविण्यासाठी लोक आतुर आहेत. २०१३ मध्ये सुरू झालेली ग्रीसची गोल्डन व्हिसा योजना मालमत्तेतील गुंतवणुकीच्या बदल्यात निवास परवाने देते, ज्यामुळे ते गैर-युरोपियन नागरिकांसाठी एक आकर्षक पर्याय बनते. त्याची सुरुवातीची मर्यादा सुमारे २५०,००० म्हणजेच २.२ कोटी रुपये युरोपमध्ये सर्वात कमी होती, ज्यामुळे लोक गुंतवणुकीकडे आकर्षित झाले आहे.

म्हापसा बसस्थानकावर एफडीएचा छापा

वृत्तसंस्था

गोवा : गेल्या वर्षभरापासून एफडीएने परराज्यातून गोव्यात येणाऱ्या भेसळ युक्त खाद्यपदार्थांवर करडी नजर ठेवली असून, वेळोवेळी यावर कडक कारवाई केली आहे. आता पुन्हा एफडीएने कारवाईचा बडगा उगारला असून म्हापसा येथील नव्या बस स्थानकावर छापेमारी करत तब्बल २०० किलो

२०० किलो बनावट बडीशेप जप्त

भेसळयुक्त बडीशेप जप्त केली आहे.

या बडीशेपची किंमत ७४ हजार रूपये आहे. ही खेप पुण्याहून गोव्यात आणल्याची माहिती समोर आली असून, यापूर्वी पुणे आणि तत्सम ठिकाणहून बनावट पनीर व इतर खाद्यपदार्थ गोव्यात आले होते.

६.८ लाखांचे ड्रग्स जप्त, महिलेस अटक

म्हापसा : राज्यात फोफावणाऱ्या ड्रग्स व्यवसायावर लगाम ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन वेगवेगळया मोहिमा राबवते. याच अनुषंगाने गुन्हे शाखेने गिरी म्हापसा येथे ड्रग्स विरोधी मोहीम राबवत एका महिलेस अटक केली. मिळालेल्या माहितीनुसार; गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे १९ सप्टेंबर रोजी अग्निवाडा-गिरी येथील रमाकांत कवठणकर यांच्या मालकीच्या भाड्याच्या खोलीत छापा टाकला.

मुंबईकरांनी आंबा खाण्याचे रेकॉर्ड मोडले

देशोन्नती वृत्तसंकलन

मुंबई : आंब्याला फळांचा राजा म्हणून संबोधले जाते. असे क्वचितच कोणी असेल ज्यांना आंबा हे फळ आवडत नसेल. आंबा म्हटले की सगळयांच्याच तोंडाला पाणी सुटते. पण मुंबईकरांनी मात्र आंबे खाण्याचे रेकॉर्ड मोडले आहेत, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. कारण यंदाच्या वर्षी मुंबईकरांनी तब्बल ०१ लाख २४ हजार ३८ टन आंबा फस्त केला असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे एकट्या मुंबईत तब्बल ५०० कोटींची उलाढाल झाली आहे. मोठा आर्थिक फायदा झाला आहे. यंदाच्या वर्षी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नियमित हंगामापूर्वी ६ नोव्हेंबरला कोकणातून हापूसची पहिली पेटी दाखल झाली होती. यानंतर काही दिवसांमध्ये मलावी हापूसचीही आवक सुरू झाली होती. पहिली पेटी लवकर आली असली तरी नियमित आंब्याची आवक फेब्रुवारीपासून सुरू झाली.

२०२३ ला फेब्रुवारीमध्ये १८०८ टन आवक झाली होती. २०२४ मध्ये ती २५६६ टनांवर पोहोचली होती. एप्रिलमध्ये सर्वाधिक ३८ हजार ७७८ टन आवक झाली होती. ग्राहकांना ऑगस्टअखेरपर्यंत आंबा उपलब्ध होता. त्यानंतर मुंबई बाजार समितीत या हंगामामध्ये ०१ लाख २४ हजार ३८ टन आवक झाली असल्याची माहिती देण्यात आली आहे.

आंब्यामुळे ५०० कोटींची उलाढाल

महत्त्वाची बाब म्हणजे, मुंबईत आंब्याची आवक वाढल्यानंतर यंदा शहरात कोकणसह कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरातमधील विविध प्रकारचे आंबे बाजारात दाखल झाले. यामध्ये हापूस, पायरी, बदामी, लालबाग, चौसा व इतर सर्व प्रकारचा आंबा मार्केटमध्ये पाहायला मिळाला. मुंबई, ठाणे, नवी मुंबईमधील ग्राहकांसह येथून मोठ्या प्रमाणात आंब्याची निर्यातही करण्यात आली. यामुळे तब्बल ५०० कोटींची उलाढाल झाली आहे.

आंबाप्रेमी मुंबईकर

मित्राला भेटण्यासाठी राहुल गांधी अचानक हरियाणात दाखल

करनाल: काँग्रेस नेते आणि खासदार राहुल गांधी आज सकाळी हरियाणातील करनाल जिल्ह्यात अचानक दाखल झाले. यांच्या येण्याने एकच गोंधळ उडाला आहे. पहाटे साडेपाचच्या सुमारास ते घोघाडीपूर गावात दाखल झाले. याठिकाणी त्यांनी एका तरुणाच्या कुटुंबाला भेट दिली असल्याचे सांगण्यात येत आहे.

राहुल गांधी अमित नावाच्या तरुणाच्या कुटुंबीयांना भेटायला आले होते. अमित अमेरिकेत राहतो आणि तिथे तो अपघातात जखमी झाला. राहुल गांधी जेव्हा अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते तेव्हा त्यांनी अमित यांची भेट घेतली होती. त्याचवेळी आता राहुल गांधी त्यांच्या कुटुंबीयांना भेटायला आले होते.

अमितच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर राहुल गांधी येथून निघून गेले. अमित यांच्यासोबत अमेरिकेत झालेल्या भेटीदरम्यान राहुल गांधी यांनी आश्वासन दिले होते की, जेव्हा ते भारत दौऱ्यावर येतील तेव्हा त्यांच्या कुटुंबाला नक्कीच भेटतील.

हा संपूर्ण अहवाल दिशाभूल करणारा अन् खोडसाळ

भारताने शस्त्र पुरवल्याचा दावा फेटाळला

वृत्तसंस्था...

नवी दिल्ली: भारताने गुरूवारी भारतीय शस्त्रास्त्र निर्मात्यांद्वारे विकले जाणारे तोफगोळे युरोपियन ग्राहकांच्या वतीने युक्रेनला पाठवल्याचा दावा करणाऱ्या अहवालाला पूर्णपणे फेटाळून लावल्याचे सांगण्यात आले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने अहवालाला सट्टा आणि दिशाभूल करणारा असल्याचे म्हटले आहे. लष्करी आणि दुहेरी-वापराच्या वस्तूंच्या निर्यातीवरील आंतरराष्ट्रीय दायित्वांचे पालन करण्याचा भारताचा एक निर्दोष ट्रॅक रेकॉर्ड आहे.

याबाबत परराष्ट्र मंत्रालयाने माहिती दिली आहे, आम्ही रॉयटर्सचा अहवाल पाहिला आहे. हे काल्पनिक आणि दिशाभूल करणारे आहे. यामध्ये भारताने नियमांचे उल्लंघन केल्याचे संकेत दिले आहेत, तर तसे काहीही नाही आणि त्यामुळे हा अहवाल चुकीचा आणि खोडसाळ आहे.

परराष्ट्र विषयक समितीच्या अध्यक्षपदी शशी थरूर

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांना परराष्ट्र विषयक संसदीय स्थायी समितीचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. तर, पक्षाचे आणखी एक ज्येष्ठ नेते दिग्विजयसिंह शिक्षण विषयक समितीची धुरा सांभाळतील. काँग्रेसला कृषी आणि ग्रामविकास विषयक स्थायी समित्यांचेही अध्यक्षपद मिळाले आहे.

त्यानुसार, पक्षाने कृषी विषयक समितीची धुरा पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांच्याकडे सोपवली. तर, ग्रामविकास समितीचे नेतृत्व

शशी थरूर यांना अध्यक्षपदाचा पूर्व अनुभव

ओडिशातील खासदार सप्तगिरी

उलाका करतील. संसदीय स्थायी समित्यांच्या अध्यक्षपदांच्या मुद्यावरून केंद्र सरकार आणि विरोधकांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाली. प्रामुख्याने परराष्ट्र, संरक्षण, अर्थ आणि गृह समित्यांच्या नियंत्रणावरून सरकार आणि विरोधकांच्या स्तरांवरून जोरदार बार्गेनिंग झाले.

हॅक झालेले युट्यूब चॅनल बंद करण्याचा निर्णय

सर्वोच्च न्यायालयाने दिली माहिती

वृत्तसंस्था

नवी दिल्ली: भारतीय सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या अधिकृत युट्यूब चॅनलसंदर्भातील महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब चॅनल आज (दि.२० सप्टेंबर) सकाळी हॅक झाले. यानंतर सर्वोच्च न्यायालयानें चॅनल बंद करून यूट्यूब या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती स्वतः सर्वोच्च न्यायालयाने एका परिपत्रकाद्वारे दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, सर्व संबंधितांना कळविण्यात येत आहे की भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे भ्दल्ऊलं चॅनल काढून टाकण्यात आले आहे. सुप्रीम कोर्ट ऑफ इंडियाच्या यूट्यूब चॅनेलवरील सेवा लवकरच पुन्हा सुरू केल्या जातील,' असेही न्यायालयाने म्हटले आहे. 'बार ॲण्ड बेंच'ने दिलेल्या वृत्तानुसार, भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे यूट्यूब (YouTube) चॅनल हॅक झाले.

न्यायालयाचा परळी पालिकेला दणका!

राजेभाऊ फड | राष्ट्रवादी अजित पवार गटाने दिली होती खोटी माहिती

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

सत्य परेशान हो सकता है लेकिन पराजित नाही परळी नगर परिषदेतील वर्क ऑर्डर अखेर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने आदेश दिल्याने मे.रिशु किचु इंडस्ट्रीज प्रा.लि.कंपनीला कामाची वर्क ऑर्डर मिळाल्याचे रासपाचे प्रदेशाध्यक्ष राजेभाऊ फड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत असे सांगितले की, आम्हाला १० कोटीच्या कामाची वर्क ऑर्डर दिलेली आहे परंतु हे सर्व खोटी माहिती आहे या बाबतीत सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

कामाचे नाव :- नगर परिषद परळी वैजनाथ यांनी वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत परळी शहरात मुख्य रस्त्यावर कोनिकाल पोल पुरवठा करून उभारणी करणे. हि निविदा मार्च २०२४ मध्ये निविदा प्रकाशित करण्यात आली. निविदा रक्कम :- ८,१३,००,४५५/-निविदा उघडल्याचे तारीख :- २२ एप्रिल २०२४ निविदेमध्ये मे . रिशू किचू इंडस्ट्रीज प्रा . लि . यांचे सर्वात कमी दराची निविदा वर्क ऑर्डर देण्यास टाळाटाळ केल्यामुळे दिनांक ११ जुलै २०२४ रोजी नगर परिषदेस वर्क ऑर्डर देणे बाबत लेखी पत्र देण्यात आले

तरी पण नगर परिषदेकडून कोणतेही उत्तर नाही म्हणून १८ जुलै २०२४ रोजी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांच्याकडे याचिका दाखल केली . आम्ही दाखल केलेल्या याचिकेची दाखल घेऊन मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी नगर परिषद परळी वैजनाथ यांना २२ जुलै २०२४ रोजी आदेशित केले की मे . रिशू किचू इंडस्ट्रीज प्रा . लि. ला तात्काळ वर्क ऑर्डर देणे. मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांच्या आदेशाची प्रत नगर परिषद परळी वैजनाथ यांना दिनांक २५ जुलै २०२४ रोजी दिल्यानंतर हि नगर परिषद ने तब्बल १८ दिवसांनी आम्हाला सदर कामाची वर्क ऑर्डर दिली असल्याचे राजेभाउ फड यांनी सांगितले.

परळीत हेल्थ केअर क्लिनिकचे उदघाटन

आवाहन: मंत्री धनंजय मुंडेंची राहणार प्रमुख उपस्थिती

परळी/पूनभुमी प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या हस्ते परळी शहरात नव्याने सुरू होत असलेल्या हेल्थ केअर क्लिनिकचे २२ सप्टेंबर रोजी उद्घाटन होत असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सेवानिवृत्त मुख्याध्यापक ए .तु . कराड व डॉ. विवेक एकनाथ कराड यांनी केले आहे.

. शहरातील प्रेम प्रज्ञा नगर आयसीआयसीआय बँकेच्या शेजारी हेल्थ केअर क्लिनिक सुरू होत आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह. भ. प. तुकाराम महाराज शास्त्री हे राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपनगराध्यक्ष ,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते वाल्मीक अण्णा कराड, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामंत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे, माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, भाजपा तालुकाध्यक्ष सतीश मुंडे व वैद्यनाथ बँकेचे माजी अध्यक्ष अशोक जैन, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नीळकंठ चाटे, नवगण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉक्टर मधुकर आघाव, दिव्यांग महामंडळ महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, माजी उपनगराध्यक्ष आयुब खान पठाण ,युवा उद्योजक प्रा. पवनकुमार मुंडे, जि. प. सदस्य प्रदीप मुंडे, भाजप नेते श्रीराम मुंडे, व वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजेश गीते ,ज्येष्ठ नेते रामभाऊ कोपनर, जेष्ठ नेते जीवराज ढाकणे, ज्येष्ठ पत्रकार तथा साहित्यिक रानबा गायकवाड, ज्येष्ठ नेते भीमराव मुंडे आदी उपस्थित राहणार आहेत. डॉ. विनय एकनाथ

पान २ वर...

पेयजल योजनेचे काम राहिले अर्धवट!

चर्चा:गुत्तेदाराने कोट्यवधीचा निधी घेतला पाण्यात

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील पेयजल योजनेचे काम अर्धवट राहीलेले असुन पेयजल योजनेचे काम करणारा भुरटा गुत्तेदार कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात घालून गुत्तेदार निधी हडप करून मोकळा झाला आहे कारण पेयजल योजने अंतर्गत झालेली पाइपलाइन अनेक ठिकाणी फुटली आहे पाइपलाइन फुटल्याने रोडवर पाण्याचे ढव साचत असल्याने तेच पानी घान पानी पाइपलाइन मध्ये परत जात आहे तेच पाणी पुरवठा लोकांना केला जात आहे त्यामुळे नागरिक अजारी पडत आहेत रोगाला बळी पडत आहेत व पेयजल योजनेचे काम पुर्ण निकृष्ट दर्जाचे झालेले आहे त्यामुळे पाइपलाइन सुध्दा भोगस झालेली आहे व पेयजल योजनेचे काम करणारा भुरटा गुत्तेदार मात्र निधी लाटुन उंटावर बसून शेळ्या हाकत आहे ही लाजिरवाणा बाब आहे असे नागरिकांतून भावना व्यक्त केल्या जात आहेत कारण कोट्यवधी रुपये योजनेसाठी माळालेले अससताना योजनेचे काम अर्धवट, तसेच अनेक गावाला पानी पीण्यसाठी पेयजल योजनेचे आहे परंतु योजना अर्धवट असल्याने पाणी मिळत नाही.पेयजल योजनेअंतर्गत चिंचोली माळी गायरान येथे झालेल्या प्रकल्पाच्या माध्यमातून आमदारा पंकजाताई मुंडे यांच्या भुरट्या गुत्तेदारांनी कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात घालून भुरटा गुत्तेदार शेंगा हानत फिरत आहे ही लाजिरवाणा बाब आहे. आमदार पंकजाताई

पान २ वर...

शैक्षणिक धोरण अंमलबजावणी करावी

मिलिंद सरपते : प्रशासनास दिले निवेदन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक धोरणान्वये काढलेल्या परिपत्रकाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा वं.ब आघाडी बीड शहर सदस्य मिलिंद सरपते यांनी शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे दिले आहे. शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या हितासाठी सरकारी आणि खासगी शाळेमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात यावेत, विद्यार्थी सुरक्षा आढावा समितीची अंमलबजावणी करण्यात यावी, सखी सावित्री समितीबाबतच्या तरतुदीचे अनुपालन करण्यात यावे, आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत, बदलापूर आणि दौंड तालुक्यातील विद्यार्थिनींसोबत मळद येथे झालेल्या अन्यायाच्या अनुषंगाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून योग्य ती पावले उचलणे काळाची गरज आहे.

शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असलेली मुले सर्व जातीधर्माची आहेत. त्यानुसार सर्व जाती धर्मातील घटकांना न्याय देणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता आणि बंधुत्व या तत्त्वात आहे. त्यानुसार कुठल्याही विद्यार्थी, विद्यार्थिनींवर अन्याय, अत्याचार होऊ नये यासाठी योग्य ती पावली उचलणे काळाची गरज आहे.असे दिलेल्या निवेदनात वंचितचे मिलिंद सरपते यांनी म्हटले आहे.

स्वगृही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

पक्षांतर: दिलीप गोरेंचा समर्थकांसह मुंबईत प्रवेश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब यांच्या भेटीनंतर पक्षप्रवेश करण्याचे निश्चित झाले. सिल्वर ओक येथे शुक्रवार दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता माजी नगराध्यक्ष दिलीप अण्णा गोरे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांसह समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लवकरच बीडमध्ये दिलीप अण्णा गोरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा मोठा कार्यक्रम आयोजित करून त्यांच्यावर पक्षाची मोठी जबाबदारी सोपवली जाईल असे स्पष्ट केले. या प्रवेशामुळे बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढणार आहे. आणि राजकीय समीकरणे सुद्धा बदलणार आहेत.

दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिलीप अण्णा गोरे यांनी म्हटले आहे की, आज सकाळी आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांना कामानिमित्त भेटीसाठी गेलो असता ११ वाजता प्रवेशाचा निर्णय सिल्वर ओक येथे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष देशाचे नेते मा. शरदचंद्रजी पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष मा. जयंतराव पाटील साहेब, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे, राज्याचे माजी आरोग्य मंत्री आमदार राजेश भैय्या टोपे, महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री अनिलजी देशमुख, बीड जिल्ह्याचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांच्या उपस्थितीमध्ये निर्णय झाला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश कार्यालयामध्ये

पान २ वर...

गावे बीड मध्येच पूर्ववत ठेवावीत

पृथ्वीराज साठे : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची मागणी!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघात येणारी बीड तालुक्यातील गावे सार्वजनिक बांधाकाम विभाग, बीड मध्येच पूर्ववत ठेवावीत अशी मागणी केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केली. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून उपजिल्हाधिकारी यांना गुरूवार, दिनांक १९ सप्टेंबर २०२४ रोजी निवेदन देण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केज विधानसभा मतदारसंघातील बीड तालुक्यात असलेल्या महसुल मंडळातील ही गावे पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग, बीडशी संलग्न होती. ही सर्व गावे बीड शहरापासून अवघ्या २० ते २५ किलोमीटर अंतरावर आहेत. त्यामुळे त्या गावातील लोकांना कामानिमित्त बीडला ये-जा करणे सोयीचे होते. परंतु, १८ ऑगस्टच्या आदेशानुसार केज मतदारसंघात येणारी बीड तालुक्यातील गावे ही अंबाजोगाई सार्वजनिक बांधकाम विभागास जोडली गेली आहेत. त्यामुळे त्या गावातील

पान २ वर...

होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा प्रतिसाद

उपक्रम: जयदत्त क्षीरसागर यांची संकल्पना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा हा कार्यक्रम बीडच्या विप्रनगर ब्राह्मणवाडी प्रभाग क्रमांक तीन या भागातील महिलांचा अलोट प्रतिसाद पाहून आबाल वृद्ध भगिनी भारावून गेल्या. या स्पर्धेचे उद्घाटन सौ.विजयाताई अशोक शेटे यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी महिला आघाडीच्या अध्यक्ष सौ.जयश्रीताई विधाते शोभाताई एकशिंगे, कमलताई क्षीरसागर, सौ.चित्राताई महाजन ,सौ.प्रियाताई रोशन बंब, सौ. शारदाताई राजेभाऊ बनसोडे, सौ.सोनलताई अरविंदसिंग पाटील, सौ. सुशीलाताई नरसिंग नाईकवाडे, सौ.शारदाताई डुगलज, सौ.वर्षाताई मेहत्रे, सौ. भारतीताई राजेश क्षीरसागर,सौ. कीर्तीताई पांगारकर, सौ. अर्चनाताई पांगारकर प्रमुख महिलांच्या उपस्थितीत व रामबीलास जी सोहणी, श्री पद्माकर कुलकर्णी, नारायणदासजी तोष्णीवाल, देविदास राव एकशिंगे वसंतराव गर्जे या प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत या स्पर्धेचे उद्घाटन झाले. या या होम मिनिस्टर स्पर्धेला महिलांचा इतका प्रतिसाद होता की, महिलांनी खूप मोठ्या प्रमाणात उस्फुर्त प्रतिसादातून ही स्पर्धा यशस्वी केली.

होम मिनिस्टर संपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीचा ही स्पर्धा प्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंखे यांच्या बहारदार व विनोदी शैलीने स्पर्धेत रंगत आणली . या स्पर्धेचा अंतिम निकाल प्रथम पैठणी विजेती महिला सौ. सौ रंजनाताई रामभाऊ लांडे या ठरल्या ,द्वितीय बक्षीस इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी सौ. रूपाली अमित शेटे तृतीय बक्षीसच्या मानकरी सौ. भाग्यश्री रवींद्र राऊत या ठरल्या तर उर्वरित सात महिलांना आकर्षक गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.

केजमध्ये अल्पवयीन मुलगी गर्भवती

कारवाई: मामाच्या मुलाविरोधात गुन्हा दाखल

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

पोटात दुखत असल्याने उपचारासाठी खाजगी रुग्णालयात गेलेली अल्पवयीन मुलगी ही साडे पाच महिन्यांची गर्भवती असल्याचा खळबळजनक प्रकार केज तालुक्यात घडला आहे. सदर पीडित मुलगी ही इयत्ता दहावीच्या वर्गात शिकत आहे. तर तिला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करणारा अन्य कोणी नसुन तिच्या मामाचा मुलगाच आहे. केज तालुक्यातील इयत्ता दहावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली अल्पवयीन मुलीच्या पोटात दुखत असल्याने दि. १५ सप्टेंबर रोजी तिची आई तिला केज येतील डॉ. चाळक यांच्या मातोश्री हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी घेवून गेली होती. तिथे तिची सोनोग्राफी केल्या नंतर समजले की, ती अल्पवयीन मुलगी ही साडेपाच महिन्यांची गर्भवती असल्याचे निदान झाले. त्या नंतर तिला अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयत भरती केले. तिच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या सल्ल्यानेच पुन्हा तिची डॉ. स्मिता शेंडगे यांच्या अर्णव डायग्नोस्टिक सेंटरमध्ये सोनोग्राफी केली असता ती साडेपाच महिन्यांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. त्याचा रिपोर्ट घेवून ती अल्पवयीन मुलगी ही तिच्या आई सोबत स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथील प्रसूती वॉर्डातील भरती झाली. त्या नंतर तिने पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटले आहे की, मागील आठ महिन्या पासून शेजारच्या गावातील तिच्या मामाचा मुलगा हा तिला लग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्यावर त्याने बळजबरीने लैंगिक संबंध प्रस्थापित केले. त्यातून ती अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिली आहे. या प्रकरणी

पान २ वर...

मोहन जगताप | आरपारच्या लढाईत साथ द्या

दबावाला झुगारून विधानसभा लढवणार!

पुण्यभूमी/दिंद्रुड प्रतिनिधी

भाजपा व राष्ट्रवादी या दोन्ही पक्षात निष्ठेने काम केले. वरिष्ठांकडून आलेले वेगवेगळे उपक्रम पदरमोड करून राबविले. आज ना उद्या न्याय मिळेल या अपेक्षेने नेतृत्वावर विश्वास ठेवला. परंतु दरवेळी आपल्या हक्कावर कोणाचे ना कोणाचे अतिक्रमण झाले. तरीही पक्षादेश शिरसावंद्य मानून दिलेल्या उमेदवाराचे प्रामाणिकपणे काम केले. मात्र आता सहनशक्तीची हद्द संपली आहे. त्यामुळे कोणाचाही दबाव आला तरी निवडणूक लढवायचीच आहे. तुम्ही या आरपारच्या लढाईत मला साथ द्या असे भावनिक आवाहन मोहनराव जगताप यांनी केले.

माजलगाव विधानसभा मतदारसंघात छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहनराव जगताप यांनी जनसंपर्क अभियान सुरू केले आहे. त्यास

दिंद्रुड येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. उद्धव महाराज ठोंबरे होते. माजी जि.प. सदस्य विलासराव बडे, माजी सभापती दिपकराव जाधव, रामदिप डाके, सरपंच अविनाश गोंडे, सरपंच राज अर्जुन, सरपंच भालचंद्र सोळंके, मधुकर डापकर, संतोष काटकर, फेरोज इनामदार, राजूभाई पठाण आदी प्रमुख कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांची आतिषबाजी करत मोहनराव जगताप यांची जुने बस स्थानक ते तुळजाभवानी देवी मंदिरापर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढली. आपल्या भाषणात मोहनराव जगताप म्हणाले की, १९९५ साली अपक्ष निवडून

पान २ वर...

> मोहनराव जगताप हे नेहमीच गोरगरिबांच्या सुखदुःखात धावून येतात. येणाऱ्या निवडणुकीत त्यांचा विजय होऊ दे, मी पायी तुळजापूरची वारी करील असे साकडे ह.भ.प. उद्धव महाराज ठोंबरे यांनी तुळजाभवानी देवीला घातले. राजकारण हा माझा विषय नाही पण सर्वसामान्य जनतेची जाण असलेला आमदार या मतदार संघाला लाभला पाहिजे अशी या मागची प्रांजळ भावना असल्याचेही महाराज म्हणाले.

माजलगाव विधासभा लढविण्याची तयारी!

पडघम:खा.सुप्रियाताई सुळे अन् प्रा.ईश्वर मुंडेंची भेट

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान सभा निवडणूका जवळ येऊन ठेपल्या आहेत.निवडणूक लढवण्यास ईच्छूक असलेले उमेदवार व पक्षांतील नेते मंडळींच्या भेटींचा सिलसिला वेगात चालू आहे.मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्यालयात संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे व माजलगाव विधान सभा निवडणूक लढवण्यास ईच्छूक असलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांची दि.२० सप्टेंबर २०२४ शुक्रवार रोजी भेट झाली.

भेटी नंतर माध्यम प्रतिनिधींशी बोलताना प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की,माजलगाव विधानसभा निवडणूक संदर्भात आपले गाव भेट दौरे,पक्ष संघटना बांधणी,मतदार संघाचे सामाजिक समिकरण या बाबींवर सविस्तर चर्चा झाली.पक्षाने संधी दिल्यास आपण माजलगाव विधान सभा मतदार संघातून निवडणूक लढू व जिंकू असे मनोगत व्यक्त केल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी सांगितले. आपल्या उमेदवारीचा गांभिर्याने विचार करून लवकरच निर्णय कळवू असे खा.सुप्रियाताई सुळे यांनी म्हटल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी सांगितले.